सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक २५ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## वक्फ कायद्यात बदल गरजेचाच; केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केले प्रतिज्ञापत्र

नवी दिल्ली : वक्फ (दुरुस्ती) कायदा २०२५ ला आव्हान देणाऱ्या याचिकांवर केंद्र सरकारने आज सर्वोच्च न्यायालयात उत्तर दाखल केले आहे. यात गेल्या १०० वर्षांपासून वक्फची मान्यता केवळ नोंदणीवर आधारित असते, तोंडी दाव्यांवर नव्हे, हे सांगत केंद्राने कायद्यातील बदल योग्य असल्याचे स्पष्ट केले आहे.

केंद्र सरकारने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, वक्फ परिषद आणि औकाफ बोर्डामध्ये २२ पैकी जास्तीत जास्त २ बिगर-मुस्लिम सदस्य असतील, जे समावेशितेचे प्रतीक असतील, ते धार्मिक हस्तक्षेप करणारे नाहीत. तसेच, सरकारी जमिनी चुकीने वक्फ मालमत्ता म्हणून नोंदवण्यात आल्यास त्या महसूल नोंदी दुरुस्त करण्याची गरज आहे हे केंद्राने स्पष्ट केले आहे. कोणतीही सरकारी जमीन कोणत्याही धार्मिक समुदायाच्या मालकीची मानली जाणार नाही, असेही सांगण्यात आले आहे.

संसदीय प्रक्रियेची पारदर्शकता अधोरेखित करत, केंद्राने सांगितले की, या विधेयकावर संसदेच्या संयुक्त समितीच्या ३६ बैठकांमध्ये



सविस्तर चर्चा झाली असून, ९७ लाखांहून अधिक जनतेकडून सूचना व निवेदने मिळाली आहेत. १० प्रमुख शहरांमध्ये जाऊन जनतेची मतं जाणून घेण्यात आली.

कायद्यावर आंशिक स्थगिती लागू शकत नाही, असे केंद्राने न्यायालयाला सांगितले. तसेच संपूर्ण कायदाच रद्द करण्याचीच प्रक्रिया असते, हे सांगून केंद्राने याचिका फेटाळण्याची मागणी केली आहे.

लोकसभेत हे विधेयक २८८ मतांनी मंजूर झालं, तर राज्यसभेत १२८ मतांनी पारित झालं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही याला मंजुरी दिली आहे.

यापूर्वी झालेल्या सुनावणीत या कायद्याबाबतची परिस्थिती तशीच राहील असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. तसेच या प्रकरणात उत्तर देण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार आणि वक्फ बोर्डला सात दिवसांचा वेळ सर्वोच्च न्यायालयाकडून देण्यात आला होता.

या कायद्याला काँग्रेस खासदार मोहम्मद जावेद आणि इतरांनी आव्हान दिले असून, सर्वोच्च न्यायालयात याचिकांची सुनावणी सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्राचे हे स्पष्ट उत्तर राजकीय आणि न्यायिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरले आहे.

## ईडीची मोठी कारवाई! मालेगावात एकाच वेळी ९ ठिकाणी छापेमारी

### ईडीची मालेगावात एकाच वेळी ९ ठिकाणी छापेमारी

मालेगाव : नुकतेच सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) ५० कोटी रुपयांच्या कर्ज फसवणुकीप्रकरणी मुंबईतील सात ठिकाणी छापे टाकले होते. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम ब्रॉडकास्ट इंजिनीअरिंग कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेडमधील (बीईसीआयएल) संशयीत अधिकाऱ्यांनी मुंबईतील कंपनीला नियमबाह्य पद्धतीने कर्ज दिले होते. त्या कर्जाची रक्कम पुणे महानगरपालिकेच्या कचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी वापरण्यात येणार असल्याचा दावा करण्यात आला होता. पण प्रत्यक्षात ती रक्कम इतरत्र वळवण्यात आल्याचे ईडीच्या तपासात निष्पन्न झाल्यामुळे ईडीचा दणका बसला होता. त्यानंतर आता नाशिकमधील मालेगावात ईडीने मोठी कारवाई केली आहे.

मालेगावमध्ये कथित बांगलादेशी आणि रोहिंग्यांना मोठ्या संख्येने चुकीच्या पद्धतीने जन्म प्रमाणपत्र दिले जात असल्याचा आरोप माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केला होता. यानंतर भारत देशातून बांगलादेशी घुसखोरांना तातडीने हाकलून काढा, अशी मागणी कोल्हापुरातील हिंदुत्ववादी संघटनांनी केली आहे. आता याप्रकरणी ईडीने मालेगावात ९ वेगवेगळ्या ठिकाणी छापेमारी केली आहे.

बांगलादेशी बोगस जन्म दाखला प्रकरणात अटक करण्यात आलेले तव्वाब शेख यांच्या राहत्या घरी ईडीने शुक्रवारी छापेमारी केली. यावेळी बनावट जन्म आणि मृत्यू दाखले बनवण्याच्या प्रकरणात ईडीने मनी लॉंड्रिंगचा गुन्हा दाखल केला. महाराष्ट्र पोलिसांनी या संदर्भात

## सावरकर प्रकरणी राहुल गांधींना सुप्रीम कोर्टाच्या कानपिचक्या

### दिलासा देतानाच भविष्यात सांभाळून बोलण्याचा इशारा

नवी दिल्ली , २५ एप्रिल : स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या संदर्भात सातत्याने वादग्रस्त आणि अपमानजनक विधाने करणाऱ्या राहुल गांधींना आज, शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने चांगलेच खडसावले आहे. राहुल यांच्या विरोधात अलाहबाद उच्च न्यायालयाच्या लखनऊ खंडपीठाने जारी केलेल्या समन्सला सुप्रीम कोर्टाने स्थगीती दिली. परंतु, स्वातंत्र्यवीरांच्या संदर्भात भविष्यात आक्षेपार्ह वक्तव्य केल्यास सर्वोच्च न्यायालय स्वतःहून (सुमोटो कॉग्नीजन्स) घेऊन कारवाई करेल असा इशारा सुप्रीम कोर्टाने राहुल गांधी यांना दिला आहे.

सुप्रीम कोर्टाने सुनावणी दरम्यान राहुल गांधी यांना चांगले सुनावले आहे.कोर्टाने म्हणले आहे की, तुम्ही महाराष्ट्रात हे वक्तव्य केलं, जिथे लोक त्यांची पूजा करतात. तुमच्या आजी इंदिरा गांधींनीही सावरकरांच्या प्रशंसेसाठी पत्र लिहिले होते. महात्मा गांधी देखील पत्रात 'युअर फेथफुल सर्व्हंट' असं लिहायचे. मग, गांधींनाही तुम्ही ब्रिटिशांचे नोकर म्हणाल का? असा खडा सवालही त्यांनी केला. त्याचबरोबर भविष्यात असं वक्तव्य केले तर कोर्ट स्वतःहून याची दखल घेईल असा इशाराच कोर्टाने दिला आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने लखनऊ कोर्टाच्या समन्सवर तात्पुरती स्थगिती दिली, पण याच वेळी कठोर इशारा दिला. 'कोणालाही स्वातंत्र्यसैनिकांविषयी चुकीची वक्तव्यं करण्याचा अधिकार नाही, असेही सुप्रीम कोर्टाने राहुल गांधींना बजावले आहे. महाराष्ट्रातील अकोला येथे १७ डिसेंबर २०२२ रोजी भारत जोडो यात्रा दरम्यान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी वीर सावरकर यांच्यावर टीका केली होती. त्यांनी सावरकरांना 'ब्रिटिशांचा नोकर' असे संबोधले होते. त्याशिवाय, सावरकरांना ब्रिटिश सरकारकडून पेन्शन मिळत असल्याचे वक्तव्य राहुल गांधी यांनी केले होते. या वक्तव्याप्रकरणी एका वकिलाने राहुल गांधी यांच्याविरुद्ध खटला दाखल केला होता.

## लष्कर-ए-तोयबाच्या कमांडरचा खात्मा

बांदीपोरा : जम्मू काश्मीरमध्ये अतिरेक्यांनी २६ पर्यटकांची हत्या केली. या घटनेनंतर भारताच्या सुरक्षा पथकांनी जम्मू काश्मीरमध्ये अतिरेक्यांच्या विरोधात कठोर कारवाई सुरू केली आहे. या कारवाईला पहिले मोठे यश मिळाले आहे.

ठोस माहिती मिळताच बांदीपोरात घेराव घालून भारताच्या सुरक्षा पथकांनी लष्कर - ए - तोयबा या पाकिस्तान पुरस्कृत अतिरेकी संघटनेचा स्वयंघोषीत कमांडर अल्ताफ लल्ली याला ठार केले. जम्मू काश्मीर पोलिसांच्या सहकार्याने संयुक्त मोहीम राबवून जवानांनी लष्कर - ए - तोयबाच्या कमांडर अल्ताफ लल्लीचा खात्मा केला. अतिरेक्यांनी मंगळवार २२ एप्रिल रोजी २६ पर्यटकांची हत्या केली.

## शेती महामंडळाच्या २२ हजार कर्मचाऱ्यांना म्हाडाची घरे देणार : बावनकुळे

मुंबई : शेती महामंडळाच्या सुमारे २२ हजार कर्मचाऱ्यांनी महामंडळ विकसित करण्यासाठी आपले योगदान दिले आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना राहण्यासाठी योग्य अशा सदनिका म्हाडाच्या माध्यमातून बांधून देण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या संचालक मंडळाची ३२७ वी बैठक मंत्रालयातील महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. महसूलराज्यमंत्री योगेश कदम, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शेती महामंडळाच्या १४ शेतमळ्यांवर २९६६ निवासस्थाने आहेत. यापैकी १७८६ निवासस्थाने राहण्यास अयोग्य ठरविण्यात आली आहेत. त्यामुळे ही निवासस्थाने रिक्त करण्याचा प्रस्ताव महामंडळाने बैठकीसाठी ठेवला होता. यावर चर्चा करताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेती महामंडळाच्या सर्वच सुमारे २२ हजार कर्मचाऱ्यांना म्हाडाच्या माध्यमातून चांगली घरे उपलब्ध करुन देण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला. गिरणीकामगारांप्रमाणे या कामगारांनाही चांगली घरे मिळाली पाहिजेत अशी भूमिका त्यांनी यावेळी घेतली. त्याला महसूलराज्यमंत्री योगेश कदम यांनीही दुजोरा दिला.

बैठकीत महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाला उत्पन्न वाढविण्यासाठी ५०० कोटींचे उद्दिष्टही देण्यात आले आहे. महामंडळाच्या ताब्यात असलेल्या सुमारे ३० हजार एकर जागेवर विविध उपक्रम राबवून हे उत्पन्न वाढविण्याच्या सूचनाही महसूलमंत्र्यांनी केल्या. त्याबरोबरच शेती महामंडळाच्या कोणत्याही जागा मोफत वापरासाठी न देण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

शेती महामंडळाच्या मळ्यावरील सेवानिवृत्त, राजीनामा, मयत कर्मचाऱ्यांना बोनस वाटपास मंजूरी देण्यात आली. तर महामंडळाच्या जमीनीवर संयुक्त शेती पद्धतीने पीक योजना राबविण्यासाठी वीज आणि सौरपंप कनेक्शन मिळण्याबाबत तसेच सोलर प्रकल्पासाठी ऊर्जा विभागाच्या प्रचलीत भाडेपट्ट्याने जागा देण्यासाठी बैठक आयोजित करण्याच्याही सूचनाही देण्यात आल्या. अहिल्यानगर जिल्ह्यातील कोकमठाण येथील महामंडळाची जमीन वखार महामंडळास व्यवसायाकरीता देणे, अकृषिक जमीनी विना निविदा शासनाच्या संलग्न संस्थांना भाडेपट्टाने देणे, संयुक्त शेतीचे करारनामे करताना प्रथम वर्षी १५० टक्के वाढ आणि दरवर्षी १० टक्के ऐवजी ५ टक्के वाढ करणे, संयुक्त शेतीसाठी ब्लॉकचा कालावधी १ एप्रिलपासून सुरु करणे, १४ मळ्यांमधील शेतजमीन भूमी अभिलेख विभागाकडे मोजणी फी भरून मोजणी करुन घेणे, पुणे मुख्यालय येथील ५४ सदनिका यांचे वापरमुल्यांच दर सुधारित करणे, १ ते २ गुंठेच्या आतील शिल्लक क्षेत्र विक्री करण्यास मान्यता देणे, नाशिक जिल्ह्यातील काष्टी ता. मालेगाव येथील १२ हेक्टर १७ आर जागा राहूरी कृषी विद्यापिठास पैशांची आकारणी करुन मंजूरी देणे आदी विषय बैठकीत मंजूर करण्यात आले.

## अतिरेक्यांशी झुंजताना दोन महिन्यांत सहा जवान हुतात्मा

उधमपूर : जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर उधमपूरमध्ये सुरक्षा पथक आणि अतिरेकी यांच्यात चकमक झाली. या चकमकीत दुडू बसंतगड परिसरात सहाव्या पॅरा एसएफचे हवालदार झंटू अली शेख गंभीर जखमी झाले. रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. भारतीय सैन्याने त्यांच्या सर्वोच्च बलिदानाला सलामी दिली आहे. जीओसी आणि व्हाईट नाईट कॉर्प्सच्या सर्व रँकनी त्यांचे धाडस आणि शौर्य याचे सन्मानाने स्मरण केले आणि त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला.

पहलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर सुरक्षा पथकांनी अतिरेक्यांना शोधण्यासाठी शोध मोहीम सुरू केली आहे. संपूर्ण जम्मू काश्मीरमध्ये अतिरेक्यांना शोधून ठार केले जात आहे. मागील दोन महिन्यात अतिरेक्यांविरुद्ध झालेल्या अकरा चकमकींमध्ये एकूण सहा जवान हुतात्मा झाले आहेत. सुरक्षा पथकांची अतिरेक्यांविरुद्धची मोहीम सुरू आहे आणि सुरू राहणार आहे.

## मुंबईच्या वेव्हज् परिषदेत नवकल्पनेसोबत तंत्रज्ञानाचा महासागर

मुंबई, दि. २४ : केंद्र सरकारच्यावतीने जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्राकरिता 'वेव्हज् २०२५ परिषद' मुंबईतील बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होत आहे. या परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवत आहेत. दि. १ ते ४ मे २०२५ या कालावधीत होत असलेल्या या परिषदेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. मुंबईत होणाऱ्या या परिषदेस विविध देशांचे मंत्री, धोरणकर्ते, उद्योगपती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

वेव्हज् परिषदेत जगभरातून १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहे. या परिषदेच्या माध्यमातून भारतातील क्रिएटिव्ह इकॉनॉमीला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्यास मदत होणार आहे. भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन उद्योग वेगाने वाढत असून रोजगारनिर्मितीसाठी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहे. त्याचबरोबर ओटीटी, निमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात देश प्रगती करत आहे. या पार्श्वभूमीवर वेव्हज् परिषदेचे आयोजन होत असून या परिषदेत चर्चासत्रे, उद्योगक्षेत्रात गुंतवणूक आणि विविध कार्यक्रम होणार आहे.

या परिषदेच्या पहिल्या दिवशी 'भारत व महाराष्ट्र पॅव्हिलियन' आणि वेव्हज प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून काही महत्त्वपूर्ण घोषणा व सामंजस्य करार (चजण) करण्यात येणार आहे. त्याचबरोबर क्रिएटोस्पिअरचे उद्घाटन आणि 'वेव्हज बझार', वेव्हज एक्सलेटर इत्यादींचा प्रारंभ होणार आहे. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी जागतिक मीडिया संवाद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमध्ये संवाद तसेच क्रिएट इन इंडिया चॅलेन्जेसची अंतिम फेरी होणार आहे. या परिषदेच्या तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी विविध चर्चासत्रांबरोबरच प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

## एप्रिल, मे महिन्यामध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून राज्यात उष्णता प्रचंड वाढत चालली आहे. एप्रिल महिन्यात तापमानात मोठी वाढ होईल असा इशारा आधीच देण्यात आला होता. हा अंदाज खरा ठरला असून या महिन्यात उष्णता प्रचंड वाढली आहे. राज्यात अनेक ठिकाणी पारा ४५ अंशांपर्यंत पोहोचला आहे. काही जिल्ह्यांना हवामान विभागाकडून उष्णतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

विदर्भात सध्या उष्णता प्रचंड वाढली आहे. चंद्रपूर सर्वात उष्ण शहर ठरलं आहे. चंद्रपूरमध्ये तापमान ४५.८ अंश सेल्सिअसवर पोहोचले आहे. अकोला, अमरावती, नागपूर आणि ब्रह्मपुरी या शहरांतही तापमानाने ४५ अंशांपर्यंत मजल गाठली आहे. या दिवसांत नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. पश्चिम विदर्भासह पूर्व भागातील शहरांत तापमानात वाढ होणार आहे. मराठवाड्यातील बीड, परभणी, हिंगोली, धाराशिव, लातूर, नांदेड या जिल्ह्यांत पारा वाढणार आहे. या जिल्ह्यांना उष्णतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. सोलापूरसह ठाणे, रायगड आणि रत्नागिरीतील नागरिकांना सुद्धा उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, २९ एप्रिलपर्यंत देशात अनेक भागांत उष्णता वाढणार आहे. पश्चिम मध्य प्रदेशात काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेसारखी स्थिती दिसून येईल. २६ एप्रिलपर्यंत उत्तर प्रदेश, बिहार, ओडिशा, झारखंड, पश्चिम बंगाल राज्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच आज आणि उद्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी उष्णता वाढण्याची शक्यता आहे.

वाढत्या उष्णतेचा शेतीवर फटका

उष्णतेच्या वाढत्या प्रमाणामुळे शेतीच्या उत्पादनावरही परिणाम होत आहे. यंदा थंडी कमी पडल्याने गव्हाची वाढ नीट झाली नाही. त्यामुळे हलक्या प्रतीचा गहू मोठ्या प्रमाणात बाजारात येत आहे. यामुळे गव्हाला कीड लागू शकण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. पुण्याच्या मार्केट यार्डमध्ये गव्हाची आवक १५ मार्चपासूनच सुरू झाली असून, सध्या गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थानमधून गहू येत आहे.

## केंद्रीय आरोग्य, कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांचा जिल्हा दौरा

छत्रपती संभाजीनगर, दि.२५(जिमाका)- केंद्रीय आरोग्य, कुटुंब कल्याण व रसायने आणि खते मंत्री जगत प्रकाश नड्डा हे रविवार दि.२७ रोजी जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम याप्रमाणे-

रविवार दि.२७ रोजी सकाळी ११ वा. ४० मि. नी छत्रपती संभाजीनगर विमानतळ येथे आगमन, सकाळी ११ वा. ४५ मि. नी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालयकडे प्रयाण, दुपारी १२ वा. कर्करोग रुग्णालयातील दोन बीम युनिटचे उद्घाटन, दुपारी १२ वा.२० मि. नी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील महात्मा गांधी सभागृहाकडे रवाना, दुपारी दीड पर्यंत महात्मा गांधी सभागृह येथे सार्वजनिक सभेस उपस्थिती, दुपारी दीड वा. हॉटेल रामा कडे प्रयाण, दुपारी पावणे दोन वा. हॉटेल रामा येथे जेवणासाठी राखीव, दुपारी ३ वा. ५० मि. नी. डॉ. हेडगेवार हॉस्पिटलकडे प्रयाण, दुपारी साडेचार वा. डॉ. हेडगेवार हॉस्पिटल येथे भेट, सायं. साडेपाच वा. डॉ. हेडगेवार हॉस्पिटल येथून विमानतळाकडे प्रयाण व सायं. ६ वा. ५५ मि. नी विमानाने दिल्लीकडे प्रयाण.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## 'गो ग्रीन'मध्ये जास्तीत जास्त ग्राहकांची नोंदणी करून पर्यावरण रक्षणास हातभार लावा

### मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

छत्रपती संभाजीनगर : महावितरणकडून गो-ग्रीन योजनेत छापील वीजबिल नाकारून केवळ ई-मेलवर बिल घेणाऱ्या ग्राहकांना वीजबिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्यात येते. आर्थिक बचतीसह कागदही वाचवणाऱ्या या योजनेत शालेय विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्तीत वीजग्राहकांची नोंदणी करून पर्यावरण रक्षणास हातभार लावावा, असे आवाहन महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी केले.




शुक्रवारी (२५ एप्रिल) शहरातील विविध शाळांत जाऊन मुख्य अभियंता कछोट यांच्यासह महावितरणच्या अधिकाऱ्यांनी गो ग्रीन योजनेविषयी विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. कुंवारफल्लीतील पी.यू.जैन माध्यमिक विद्यालयात संस्थेचे उपाध्यक्ष सुनील सेठी यांच्या सहकार्याने झालेल्या कार्यक्रमास मुख्याध्यापक विजय पाटोदी, विशाल पाटणी, महावीर संगवे, दर्शना पाटणी, प्रियंका कासलीवाल, अजय पहाडे आदींची उपस्थिती होती. हर्सुल येथील रायजिंग स्टार स्कूलमध्ये झालेल्या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अरुण निकम, मुख्याध्यापिका कावेरी निकम यांची प्रमुख उपस्थिती होती. अंकुश मोकाशी यांनी सूत्रसंचालन केले. महावितरणच्या शहागंज उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता संजीव कोंडगुळी, सहायक अभियंता सचिन लालसरे, राजेंद्र राठोड यांनी दोन्ही कार्यक्रमांच्या आयोजनासाठी पुढाकार घेतला.

यावेळी मुख्य अभियंता कछोट यांनी गो ग्रीन योजना व ग्राहकांच्या नोंदणी प्रक्रियेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. छापील वीजबिलासाठी कागद लागतो आणि कागदनिर्मितीसाठी वृक्षतोड केली जाते. पर्यायाने निसर्गाचे संतुलन बिघडते. विद्यार्थ्यांनी गो ग्रीन योजनेत आपल्या परिसरातील जास्तीत जास्तीत ग्राहकांची नोंदणी करून त्यांना आर्थिक बचतीचे व पर्यावरणाचे महत्त्व पटवून द्यावे, असे आवाहन कछोट यांनी केले. जे विद्यार्थी गो ग्रीन योजनेत किमान ५० ग्राहकांची नोंदणी करतील त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे, तसेच सर्वाधिक ग्राहकांची नोंदणी करणाऱ्या शाळांचाही विशेष गौरव करण्यात येणार आहे, असे ते म्हणाले. पीएम-सूर्यघर योजनेची माहितीही त्यांनी दिली. शासनाकडून ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान मिळणाऱ्या या योजनेत छतावर सौरऊर्जा बसवून ग्राहकाला वीज निर्मिती करून विजेबाबत स्वावलंबी होता येते, असे त्यांनी सांगितले.

इटखेडा येथील अग्रसेन विद्यालयात छावणी उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता शेख अब्दुल्लासाजीद यांनी गो ग्रीनबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी प्राचार्य संतोष करवा यांची प्रमुख उपस्थिती होती. आधुनिक जीवनशैलीशी सुसंगत 'गो-ग्रीन' योजनेत छापील वीजबिलांचा वापर बंद केला तरी महावितरण मोबाईल ॲप व वेबसाईटवर ग्राहकांसाठी चालू व मागील वीजबिल तसेच वीजबिल भरण्याच्या पावत्या आदींची माहिती उपलब्ध आहे. वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संगणकीय प्रणालीद्वारे ते गो-ग्रीन योजनेत सहभागी ग्राहकांना ई-मेलद्वारे पाठविण्यात येते. सोबतच एसएमएसद्वारेही वीजबिलाची माहिती देण्यात येते. त्यामुळे प्रॉम्प्ट पेमेंटसह ऑनलाइन पद्धतीने लगेचच बिल भरणा करणे आणखी सोपे झाले आहे.

छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील सर्व शाळांतील इयत्ता सातवी ते नववी या वर्गांतील विद्यार्थ्यांना गो ग्रीन नोंदणीच्या उपक्रमात सामील करून घेतले जाणार आहे. ३० जूनपर्यंत विद्यार्थ्यांना नोंदणीची मुदत देण्यात आली असून, महावितरणचे अधिकारी, कर्मचारी त्यांना तांत्रिक साह्य करणार आहेत, असे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी सांगितले.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (१०१) संघपरिवार

संघ पॉवर हाऊस सारखे आहे याबद्दल सविस्तर अलक (९५) मध्ये लिहिलेच आहे. त्याला अनुसरूनच संघ समाजात पूर्णतः शिरावा या नात्याने / न्यायाने संघ परिवार तयार झाला. त्यातील वि.हि.प- अभाविप- विवेकानंद शिला स्मारक- वनवासी कल्याण आश्रम- भारतीय मजदूर संघ-विद्याभारती याविषयी सविस्तर, मागील अलक मधून आपण वाचले असेलच. आज परिवारातील बाकी इतर संघटनांची ओळख करून देते याला संघाची ींलीशश्रश्र रेसरपळींळेप असे देखील म्हणतात. भारतीय किसान संघ, हिंदू स्वयंसेवक संघ, धर्म जागरण समिती, स्वदेशी जागरण मंच, सेवाभारती, लघुउद्योगभारती, सहकार भारती, बजरंग दल, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रसेविका समिती, भारतीय विचार केंद्र हिंदुस्तान समाचार, विश्व संवाद केंद्र, विवेकानंद केंद्र, सामाजिक समरसता मंच, व ऑर्गनायझर, पांचजन्य, तरुण भारत सारखी वृत्तपत्रे, राष्ट्रीय शिख संगत, तसेच राष्ट्रीय मुस्लिम मंच, अशा अजून कितीतरी संघटना आहेत. ज्या संघाच्या एकाच छत्री खाली काम करतात. संघ हिंसक गोष्टीत रस घेत नाही त्याला हिंसा प्रिय नाही. संघ आतंकवादी नाही. संघाचे ध्येय परं वैभवं नेतुमेत् स्वराष्ट्र हे आहे.

क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## 'अवर पॉवर, अवर प्लॅनेट' या थीमनुसार एकत्रित

मुंबई : 'अर्थ डे' निमित्त यावर्षी संपूर्ण जग 'अवर पॉवर, अवर प्लॅनेट' या थीमनुसार एकत्रित येत असताना आम्हाला देखील या गोष्टीची जाणीव आहे कि आपल्या पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्यापैकी प्रत्येकावर आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या (टीकेएम) मूलभूत मूल्यांमध्येच ही जबाबदारी समाविष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे आम्ही सातत्याने नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान तयार करत आहोत आणि वेगवेगळ्या प्रकारची इलेक्ट्रिफाईड वेहिकल टेक्नॉलॉजी (एती*) विकसित करत आहोत, ज्यामध्ये पर्यायी इंधनावर चालणाऱ्या पॉवरट्रेन्सचा(वाहनांचा) समावेश आहे. या प्रयत्नांत आम्ही अनेक मार्गानी काम करत आहोत, त्याचबरोबर अक्षय ऊर्जेचा(रिनिवेबल एनर्जी) वापर करून सामूहिक शाश्वत उपक्रमांचे नेतृत्व करत आहोत जेणेकरून पर्यावरणदृष्ट्या सक्षम जग घडवता येईल.

## ड्रीम टेक्नॉलॉजीनं भारतीय ग्राहकांप्रती आपली बांधिलकी घट्ट केली

नवी दिल्ली : स्मार्ट होम टेक्नॉलॉजी क्षेत्रात जागतिक नेतृत्व असलेल्या ड्रीम टेक्नॉलॉजीनं बॉलिवूड अभिनेत्री कृति सेनन हिला आपला पहिला भारतीय ब्रँड ॲम्बेसेडर जाहीर केलं आहे. ही भागीदारी भारतात नाविन्यपूर्ण आणि बुद्धिमान गृह उपाययोजना आणण्याच्या ड्रीमच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे, जो रोजच्या घरगुती कामांना अधिक सोपं आणि कार्यक्षम बनवण्याच्या दिशेनं एक नवी व्याख्या ठरतो आहे. कृति सेनन आणि ड्रीम टेक्नॉलॉजी यांच्यातील ही जोडी भारतातील कंपनीचं अस्तित्व आणखी मजबूत करण्यासाठी एक मोठं पाऊल आहे. यामागचा उद्देश म्हणजे अशा भारतीय ग्राहकांना लक्षात घेऊन स्मार्ट उपाययोजना देणं, जे स्वच्छता आणि पर्सनल केअरसाठी इंटेलिजंट प्रोडक्ट्स शोधत आहेत, जेणेकरून ते स्वतःच्या स्वप्नातील आयुष्याकडे लक्ष केंद्रित करू शकतील.

## 'युध्रा'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर होत आहे झी सिनेमावर!

मुंबई, एप्रिल २०२५: पोलीस, गुन्हेगार, गोंधळ - उत्कंठावर्धक क्षणांची रेलचेल. त्यात भर घाला दमदार ॲक्शनची, एक रहस्यमयी गुंड ज्याचा गडद भूतकाळ आहे आणि एक मिशनही, जे सगळे काही बदलू शकते. 'युध्रा' हा एक स्फोटक ॲक्शन थ्रिलर आहे, जो तुमच्या स्क्रीनवर धुमाकूळ घालेल. या वीकेंडला झी सिनेमा घेऊन येत आहे पॉवर, ॲक्शन आणि ड्रामाचा एक तगडा मिलाफ - पाहा 'युध्रा'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर, रविवारी २७ एप्रिल दुपारी १२ वाजता, फक्त झी सिनेमावर!

## कलाकारांनी व्यक्त केली चहाप्रती त्यांची आवड!

आपल्यापैकी अनेकांना कपभर चहाचा आस्वाद घेण्यामधून कम्फर्ट मिळतो. पण शूटिंगचे व्यस्त वेळापत्रक, लवकर कॉल टाइम्स आणि भावनिकदृष्ट्या प्रखर सीन्सच्या अवतीभोवती गुंतलेल्या कलाकारांसाठी चहाचे महत्त्व मोठे आहे. नॅशनल टी डे निमित्त एण्ड टीव्ही कलाकार दैनंदिन सोबती असलेल्या चहासोबतच्या त्यांच्या नात्याबाबत सांगत आहेत, जेथे चहा त्यांना व्यस्त कामकाजादरम्यान ऊर्जा, उबदारपणा आणि आरामदायी क्षणांचा अनुभव देतो. स्मिता साबळे (मालिका 'भीमा'मधील धनिया), योगेश त्रिपाठी (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील दरोगा हप्पू सिंग) आणि शुभांगी अत्रे (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील अंगूरी भाबी) त्यांच्या आवडत्या चहामधून कशाप्रकारे आरामदायीपणा व शांतता मिळते.

## एका खास स्नेहभेटीसोबत सपना सिकरवारचा वाढदिवस

अँड टीव्ही च्या 'हप्पू की उलटन पलटन'मधील बिमलेश या भूमिकेसाठी ओळखल्या जाणाऱ्या सपना सिकरवार यांनी आपल्या प्रियजनांसोबत अत्यंत आनंद व उत्साहात वाढदिवस साजरा केला. या कार्यक्रमात त्यांचे कुटुंबिय, जवळचे मित्रमैत्रिणी, माजी सहकारी आणि विद्यमान सहकलाकार सहभागी झाले. त्यांनी या निमित्ताने अविस्मरणीय स्नेहभेटीचे आयोजन केले.

## निलेश सराफ यांचे निधन



तभा वृत्तसेवा

पैठण दि २५: पैठण शहरातील रंगारहट्टी येथिल रहिवासी निलेश विनोदचंद्र सराफ यांचे दि.२५ एप्रिल शुक्रवार रोजी सकाळी ११:२९ वाजता दुःख निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर शनिवार सकाळी ०९:०० वाजता नागघाट येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.त्यांच्या पश्चात आई, भाऊ, भाऊजयी असा परिवार आहे.

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाची परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती अर्ज करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.२५(जिमाका)- इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत राज्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी QS Quacquarelli symmonds ranking(जगभरातील विद्यापीठांची क्रमवारी) २०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या ७५ विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिष्यवृत्तीसाठी शाखानिहाय, अभ्यासक्रमानिहाय जागा उपलब्ध आहे. त्यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी www.obcbahujankalyan.maharashatra.gov.in किंवा https://.obcbahujankalyan.maharashatra.gov.in या वेबसाईटवरुन अर्ज डाऊनलोड करुन तो परिपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रासह दि.१७ मे रोजी सायंकाळी सव्वा सहा वा. पर्यंत समक्ष किंवा पोस्टाने इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, आकार प्रिमायसेस, दुसरा मजला एम.एच.बी.कॉलनी, म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स, समता नगर, येरवडा पुणे ४११००६ येथे दोन प्रतीत सादर करावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक दत्तात्रय वाघ यांनी केले आहे.

## राजेंद्र पवार महावितरणच्या संचालक (मानव संसाधन) पदी रुजू



**महावितरणच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी मानव संसाधनाचे एक आश्वासक व्यवस्थापन सदैव उपलब्ध राहील. कंपनी व कर्मचारी हिताला प्राधान्य देत अंतर्गत प्रशासकीय कामकाज आणखी गतिमान करण्यासह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रशिक्षणातून कर्मचाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य वाढविण्यावर भर राहणार आहे.**
**- राजेंद्र पवार, संचालक (मानव संसाधन)**

छत्रपती संभाजीनगर : महावितरण कंपनीचे संचालक (मानव संसाधन) म्हणून राजेंद्र पवार यांनी शुक्रवारी (२५ एप्रिल) कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

महावितरणमधील सेवेचा ३६ वर्षांचा अनुभव असणारे नवनियुक्त संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार हे मूळचे भऊर (ता. देवळा, जि. नाशिक) येथील रहिवासी आहेत. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी पुणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून (सीओईपी) विशेष प्रावीण्यासह प्राप्त केली आहे. त्यानंतर १९८९ मध्ये तत्कालिन म. रा. विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून वाशी (ता.पेण) येथे रूजू झाले. त्यानंतर पदोन्नतीवर त्यांनी सहायक अभियंता, उपकार्यकारी अभियंता पदी काम केले आहे. सन २०११ मध्ये थेट भरती प्रक्रियेमधून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. या काळात त्यांनी पेण, कळवण, नाशिक, पनवेल, कल्याण येथे काम केले आहे. तसेच अधीक्षक अभियंता म्हणून नागपूर व पुणे येथे काम केले आहे. तर गेल्या सव्वादोन वर्षांपासून पवार पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी याआधीच्या सेवेत लोकाभिमुख प्रशासन, ग्राहकसेवा आणि मानव संसाधन व्यवस्थापनात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुणे परिमंडलामध्ये मुख्य अभियंता म्हणून त्यांनी महसूलवाढ, नवीन वीजजोडण्या, छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांमध्ये विक्रमी कामगिरी केली आहे. सोबतच कर्मचारी प्रशिक्षण व कार्यशाळा, कर्मचारी प्रोत्साहनपर विविध उपक्रम, कर्मचारीपाल्यांची अनुकंपा तत्त्वावरील भरती प्रक्रिया आदींना मोठा वेग दिला. त्यांच्या नेतृत्वात प्रशिक्षण व विविध उपक्रमांमुळे पुणे लघु प्रशिक्षण केंद्राला सलग तीन वर्ष राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्यापूर्वी पवार यांनी स्वतः 'ऑन फिल्ड' राहून मुंबईचा महापूर, 'तौक्ते', 'निसर्ग' चक्रीवादळे, 'कोरोना' आदी संकटांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे नेतृत्व केले आहे.

## समर्थ इंग्लिश मिडियम स्कूल, पुसद - यवतमाळ जिल्ह्यातील उत्कृष्ट शाळा पुरस्काराने सन्मानित

पुसद, दि._ : समर्थ इंग्लिश मिडियम स्कूल, पुसद यांना महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज असोसिएशन तर्फे यवतमाळ जिल्ह्यातील उत्कृष्ट शाळा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. ठाणे येथील काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात पार पडलेल्या एका भव्य सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला.

ही शाळा शैक्षणिक गुणवत्तेतील सातत्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न आणि आधुनिक व नाविन्यपूर्ण शैक्षणिक संकल्पनांचा प्रभावी अवलंब यामुळे या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवडण्यात आली.

शाळेच्या या यशावर बोलताना शाळेच्या संचालिका अनघा विजय चक्रवार म्हणाल्या, हा पुरस्कार म्हणजे केवळ आमच्या शाळेची नव्हे तर पुसदच्या शिक्षण क्षेत्राचीही मानाची गोष्ट आहे. आमचा विद्यार्थी केंद्रित दृष्टिकोन, शिक्षकांचे सातत्यपूर्ण योगदान आणि पालकांचा विश्वास यामुळेच हे यश शक्य झाले. पुढील काळातही आम्ही शिक्षणाच्या गुणवत्तेत सातत्य राखत राहू.

समर्थ इंग्लिश मिडियम स्कूलने आपल्या कार्यकुशलतेने व समर्पणाने जिल्ह्यातील इतर शाळांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. हे यश शाळेचे व्यवस्थापन, शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि पालकवर्ग यांचे सामूहिक योगदान दर्शवते.

## संतोष विठोबा झगडे यांना समाज भूषण पुरस्कार प्रदान



मुंबई : कोकण मराठी पत्रकार संस्था प्रथम वर्धापन दिनानिमित्त रविवार दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी गणेश मंगल कार्यालय कालकाई मंदिराशेजारी, भरणे नाका ता. खेड जिल्हा रत्नागिरी येथे आयोजित शानदार समारंभात समाजासाठी भरीव योगदान देणाऱ्या कोकण रत्नाच्या सत्कार सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री, रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. उदय सामंत साहेब त्याचप्रमाणे गृह राज्य मंत्री मा. ना. योगेशदादा कदम साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत संतोष विठोबा झगडे यांना सन्मानपूर्वक समजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संतोष विठोबा झगडे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील सैतवडे गावचा. स्वतःच्या जन्म झालेल्या जिल्ह्यात या पुरस्कारासाठी संतोष विठोबा झगडे यांची निवड झाली हा त्यांचा मोठा गौरव आहे. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून दैनिक प्रहार चे संपादक सुकृत खांडेकर, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली चे कुलगुरू मा. ना. श्री संजय भावे, दैनिक पुढारीचे निवासी संपादक शशिकांत सावंत, वसई विरार पत्रकार संघांचे अध्यक्ष अनिलराज रोकडे, महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट मुंबई चे अध्यक्ष. श्री अजय जी बिरवटकर फॉरवर्ड सीमेन्स युनियन चे अध्यक्ष श्री. नरेश बिरवाडकर हे हे व इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मा. श्री. एकनाथ बिरवटकर यांनी केले होते..

## 'मास्टर' मोहन आगाशे आणि 'ब्लास्टर' सिद्धार्थ जाधव एकत्र; 'आतली बातमी फुटली' चित्रपटात दिसणार वेगळ्या अंदाजात

छत्रपती संभाजीनगर : नेमक्याच तरीही प्रभावी भूमिका करण्याकडे ओढा असणाऱ्या कलाकारांमध्ये ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे आणि अभिनेता सिद्धार्थ जाधव ही नावे आवर्जून घेतली जातात. आतापर्यंत मोजक्या पण हटके चित्रपटांमध्ये दिसणारे हे दोन चतुरस्त्र कलाकार दिग्दर्शक विशाल पी.गांधी यांच्या 'आतली बातमी फुटली' या आगामी मराठी चित्रपटातून पहिल्यांदाच प्रेक्षकांसमोर येत आहेत. या दोघांचं एक पोस्टर नुकतंच प्रदर्शित करण्यात आलं आहे. ज्यात मोहन आगाशे यांनी सिद्धार्थ जाधव याच्यावर बंदूक रोखलेली पाहायला मिळतेय. या मागचं नेमकं कारण काय असेल ? हे पाहण्यासाठी ६ जूनला येणारा 'आतली बातमी फुटली' हा चित्रपट पाहावा लागेल.

## अनधिकृत संस्था आढळुन आल्यास संपर्क साधण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.२५, (विमाका) :- पुणे जिल्हयातील आळंदी व ठाणे जिल्ह्यातील खडबली येथे बेकायदेशीर बालगृहे, वसतिगृहे, अनाथाश्रम चालविले जात असल्याबाबतच्या बातम्या प्रकाशित झालेल्या आहेत. आपल्या आसपासच्या परिसरामध्ये अशा प्रकारच्या अनधिकृत संस्था आढळुन आल्यास जिल्हयातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तसेच चाईल्ड हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०९८ या वर संपर्क साधुन बालकांवरील शारिरीक तसेच लैंगिक अपराधास प्रतिबंध करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महिला व बाल विकास आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

पुणे जिल्हयातील आळंदी व ठाणे जिल्ह्यातील खडबली येथे बेकायदेशीर बालगृहे, वसतिगृहे, अनाथाश्रम चालविले जात असल्याबाबतच्या बातम्या प्रकाशित झालेल्या आहेत. वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेल्या बातम्यानुसार तसेच सदर संस्थांमध्ये बालकांना अनधिकृतपणे डांबून ठेवण्यात येवून त्यांचे शारिरीक, मानसिक आणि लैंगिक शोषणाच्या घटना घडत असल्याबाबतच्या बातम्या प्रसिध्द झाल्याबाबत निदर्शनास येत आहे. सदर बाब ही अत्यंत गंभीर स्वरुपाची असून बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या आहेत.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ मधील कलम ४२ नुसार मान्यता तथा सोबतच्या नोंदणी प्रमाणपत्राप्रमाणे नोदणी प्रमाणपत्र प्राप्त नसलेली संस्था अथवा अशी संस्था चालविणाऱ्या व्यक्तीला १ वर्ष कारावास तसेच रुपये १ लक्ष पेक्षा कमी नसेल एवढा दंड किंवा दोन्हीही करण्यात येईल अशी तरतुद आहे.

# आचार्य विशुध्दसागरजी महाराज यांच्या पटटाचार्य उत्सवाचे आयोजन

### शहरासह देशभरातुन येणार हाजरो भाविक

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - इंदौर शहरातील गांधीनगर भागातील सुमतीधाम येथे दिनांक २७ एप्रिल ते २ मे या कालावधीत जैन समाजातील सहा दिवसीय पटटाचार्य महोत्सव व जैन समाजाचा महाकुंभ आयोजीत करण्यात आले असल्याची माहिती आज पत्रकार परिषदेत गुरैभक्त मार्गदर्शक न्या.कैलासचंद चांदीवाल, मुख्य संयोजक आनंद सेठी, संयोजक ललीत पाटणी, सहसंयोजक महेंद्र ठोले, सहसंयोजक गीत सेठी यांनी सांगीतले. प.पु.गणाचार्य विरागसागरजी महाराज यांचे नुकतेच जालना येथे समाधीमरण झाले त्यांचे पटटाचार्य पद हे आचार्य विशुध्दसागरजी महाराज यांना देण्यात येणार आहे. यावेळी आचार्य विरागसागरजी महाराज दिक्षीत, आचार्य उपाध्याय, मुनि, गणनी, आर्यिका, ऐलक, क्षुल्लक, क्षुल्लिका, ब्रम्हचारी यांच्यासह ४०० साधु संतांची यावेळी उपस्थिती राहणार आहे. तसेच कार्यकमासाठी विश्वभरातील दिगंबर जैन समाज या महाकुंभ मध्ये उपस्थित राहणार आहे. तसेच महामहोत्सवासाठी राजनेता व राज्याचे नेतागण सुध्दा उपस्थित राहणार आहे. या महोत्सवाची मागच्या ६ महिन्यांपासुन तयारी चालु आहे. यावेळी पत्रकार परिषदेते सांगीतले की, पटटाचार्य महामहोत्सवात इंदौर सह पुर्ण भारत व विदेशातुन सुध्दा समाज बांधव उपस्थित राहणार आहे. या महोत्सवासाठी ऑनलाईन नोंदणीसुध्दा करण्यात आली आहे. या महोत्सवासाठी श्री.सुमतीनाथ दिगंबर जिनालय गोधा इस्टेट पटटाचार्य महोत्सव समिती व गुरैभक्त परिवाराचे सपना मनिष गोधा या कार्यकमासाठी विशेष परिश्रम घेत आहे. या महोत्सवासाठी भव्य असा मंडप उभारण्यात आला आहे. या मंडपाचे नांव देशना मंडप असे ठेवण्यात आले आहे. अक्षय तृतीया या पावन दिवशी अर्थात दिनांक ३० एप्रिल रोजी पटटाचार्य पदारोहन होणार आहे. यावेळी गणाचार्य पुष्पदंतसागरजी महाराज व आचार्य प्रज्ञासागरजी महाराज यांची उपस्थिती यावेळी राहणार आहे. ६५ एक्करमध्ये हा कार्यकम संपन्न होणार आहे. या ऐतिहासिक कार्यकमात २० हजार पुरैष / महिला बसु शकतील असा मंडप तयार करण्यात आला आहे. तसेच वाताणुकुलीत २५ हजार क्षमता असलेले चार भोजन शाळा बनविण्यात आले आहे. तसेच ५ हजार क्षमता असलेली त्यांगी वृत्तीसाठी स्वतंत्र स्वयंपाकघर बनविण्यात आले आहे. तसेच ३६० चौकीमध्ये साधु संतांचे आहार संपन्न होणार आहे.



दिनांक २७ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता सुमतीधाम येथे आचार्यश्रींचे आगमन होईल. तदनंत ९ वाजता प्रवचन, १०.३० वा. आहारचर्या, दुपारी २ वा. पत्रकार संमेलन, दुपारी २.३० वा.स्वाध्याय, दुपारी ३ वा. प्रवचन, संध्याकाळी ६ वाजता आचार्य भक्ती प्रतिव्रैमण, रात्री ८ वाजता प्राजेक्शन मॅपींग, रात्री ८.३० वा.लेजर शो, रात्री ९ वाजता आदीनाथ गाथा भाग १ यावर सांस्कृतिक कार्यकम होणार आहे.

दिनांक २८ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता भगवंताचा अभिषेक ध्वजारोहन, तसेच ८ वा. दिप प्रज्वलन, पाद पक्षालन, शास्त्र भेट व आचार्य विरागसागरजी महाराज यांची पुजा, सकाळी ९ वाजता प्रवचन, १०.३० वा.आहारचर्या, दुपारी १ वा.गणधरवलय विधान, संध्याकाळी ६ वा. आचार्य भक्ती प्रतिकमण, रात्री ७.३० वा. आरती, रात्री ९ वाजता आदीनाथ गाथा भाग २ यावर नाटीका .

दिनांक २९ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता भगवंताचा अभिषेक शांतीधारा, सकाळी ८ वा. आचार्यसंघाची पुजा व सिंहासन कमंडल व पिच्छी जाप माळा शास्त्र भेट, तसेच आर्यिका क्षुल्लिका माताजी यांना वस्त्र भेट,सकाळी ९ वाजता प्रवचन, १०.३० वा.आहारचर्या, दुपारी २.३० वा.स्वाध्याय व शास्त्र प्रदर्शनाचे उदघाटन, दुपारी ३ वा.प्रवचन, रात्री ७.३० वा. आरती, रात्री ८.३० वा. स्वस्तीमेहुल ग्रुपच्या वतीने भजन संध्या संपन्न होईल.

दिनांक ३० एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता भगवंताचा अभिषेक शांतीधारा, ६.३० वा.भव्य शोभायात्रा सकाळी ७ वा. पटटाचार्य पद प्रतिष्ठा संस्कार समारोह, १०.३० वा.आहारचर्या, दुपारी ३ वा.साहित्य विमोचन व प्रवचन, रात्री ७.३० वा. आरती, रात्री ९ वा. सम्राट खारवेल यांची लघु नाटिका सांस्कृतिक कार्यकम संपन्न होईल. दिनांक ०१ मे रोजी सकाळी ७ वाजता भगवंताचा अभिषेक शांतीधारा, सकाळी ८ वा. व दुपारी २.३० गणाचार्य विरागसागरजी महाराज यांच्या व्यक्तीत्व, कृतीत्व वर राष्ट्रीय विदवकत्व संगोष्ठी प्रवचन होणार आहे. १०.३० वा.आहारचर्या, दुपारी २.३० वा.स्वाध्याय व शास्त्र प्रदर्शनाचे उदघाटन, दुपारी ४.३० वा.प्रवचन, रात्री ७.३० वा. आरती, तसेच रात्री ९ वाजता महावीर गाथा या विषयावर सांस्कृतिक कार्यकम नाटिका संपन्न होणार आहे.

दिनांक ०२ मे रोजी सकाळी ७ वाजता भगवंताचा अभिषेक शांतीधारा, ७.३० वा.प.पु. विरागसागरजी महाराज यांचा ६२ वा जन्मजयंती समारोह महापुजा, आतरी व गुणानुवाद सभा, १०.३० वा.आहारचर्या, दुपारी २.३० वा.स्वाध्याय, रात्री ७.३० वा. आरती, रात्री ८.३० वा. लेजर शो. होणार आहे. वरील कार्यकम हा देशना मंडप व वात्सल्य मंडप येथे होणार आहे. वरील कार्यकमासाठी छत्रपती संभाजीनगर शहरासह नाशिक, मुंबई, पुणे, नागपुर, कोल्हापुर, सोलापुर, इंदौर, भोपाळ, जयपुर, जबलपुर, जळगांव, आदी ठिकाणाहुन हजारो भक्तगण उपस्थित राहणार आहे. आचार्य विशुध्दसागरजी महाराज यांचा ऐतिहाासक चातुर्मास हा छत्रपती संभाजीनगर शहरात झालेला आहे. येथेही त्यांचे हजारो गुरैभक्त उपस्थित राहणार आहे. अशी माहिती गुरैभक्त मार्गदर्शक न्या.कैलासचंद चांदीवाल, मुख्य संयोजक आनंद सेठी, संयोजक ललीत पाटणी, सहसंयोजक महेंद्र ठोले, सहसंयोजक गीत सेठी यांनी दिली असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# मानसिक शांतीसाठी राजयोग केंद्र तयार-उषा दीदीजी

**ब्रह्मकुमारीज केंद्राचा लोकार्पण सोहळा संपन्न**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२५ एप्रिल**

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या नवीन 'प्रभू दर्शन भवन' वास्तूचे लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी ब्रह्मकुमारी मुख्य ठिकाण माउंट आबू येथील राजयोगिनी उषा दीदीजी तसेच प्रकाश सोळंके यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे कानडे साहेब( संस्थापक मंगलनाथ मल्टिस्टेट), राजयोगिनी सोमप्रभा दीदीजी संचालिका उपक्षेत्र सोलापूर, राजयोगिनी अर्चना दीदी परभणी सेवा केंद्र, संगीता बाहेनजी बार्शी,मेरादीदी अंबड, राजयोगी ब्रह्मकुमार भरत भाईजी मुख्य अभियंता माउंट आबू, प्रज्ञादीदी सेवा केंद्र बीड यांच्या हस्ते ब्रह्माकुमारी सेंटरचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते झेंडावंदन करून भीत कापण्यात आली. सर्व मान्यवरांचे स्वागत सत्कार सेवा केंद्र संचालिका अनिता दीदी व शिलादीदी यांनी केले. 'प्रभू दर्शन' वास्तू उभारण्यासाठी ज्यांनी सहयोग केला त्या सर्वांचे सत्कार करण्यात आले. मुख्य वक्त्या राजयोगिनी ब्रह्मकुमारी उषा दिदीजी म्हणाल्या या वास्तूचा उपयोग आपल्या सर्वांचे जीवन अंधाराकडून प्रकाशाकडे नेण्यासाठी आहे. उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती पत्रकार उमेश जेथलिया, प्रा.सुदर्शनजी स्वामी, सखाराम तौर वरिष्ठअभियंता, बाळू ताकट, प्रा. संगीता जाधव यांची होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दूरचित्रवाहिनी निवेदिका अनिता करवा यांनी केले तर आभार बालाजी बचाटे यांनी मानले.. या कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य दिगंबर सादोळकर, केशव बादाडे, कैलास सोळंके, सिद्धेश्वर भाई, शिवाजी भाई, नामदेव भाई तसेच माता-भगिनी यांनी केले.




# पहलगाम येथे निर्दोष लोकांवर झालेल्या आतंकी हल्ल्याचा इमदादुल च्या विद्यार्थ्यांनी केला जाहीर निषेध

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२५ एप्रिल**

पहलगाम येथे निर्दोष लोकांवर झालेल्या आतंकी हल्ल्याचा जाहीर निषेध करत हल्ल्यात मृत्यूमुखी झालेल्याना इमदादुल उलूम शाळेच्या विद्यार्थी, शिक्षकांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



परळी येथील इमदादुल उलूम शाळेत गुरुवार दि.२४ रोजी पहलगाम येथे निर्दोष लोकांवर झालेले आतंकी हल्ल्याचा जाहीर निषेध करत हल्ल्यात मृत्यूमुखी झालेल्याना श्रध्दांजली अर्पित करण्यात आली.यावेळी इमदादुल उलूम शाळेचे विद्यार्थी व शिक्षक,कर्मचारी सहभागी होते.

# आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड परीक्षेत विशाखा साळवे ला गोल्ड मेडल

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२५ एप्रिल**

आंतरराष्ट्रीय मथ ऑलिम्पियाड परीक्षेत श्री. सिद्धेश्वर विद्यालय शाळेतील इयत्ता पहिली वर्गामध्ये शिकत असलेली विशाखा विजय साळवे या विद्यार्थीनीने झोनल लेव्हल टॉपर मध्ये क्रमांक पटकवला आहे.



आंतरराष्ट्रीय मथ ऑलिम्पियाड परीक्षासाठी विशाखा साळवे हिने जिद्दीने अभ्यास केल्यामुळे गोल्ड मेडल प्राप्त करून यश संपादन केले .श्री सिद्धेश्वर प्राथमिक विद्यालय येथे पालक मेळावा व ऑलंम्पियाड गोल्ड मेडल विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह ड.विश्वासराव जोशी, प्रमुख पाहुणे शालेय समिती अध्यक्ष पवन मानधने,पालक प्रतिनिधी लक्ष्मीकांत भावसार,शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती सुमती भारती गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती. विशाखा च्या यशाबद्दल मुख्याध्यापिका श्रीमती सुमती भारती, वर्ग शिक्षक गणेश जोशी यांनी अभिनंदन केले.

# माजलगाव वकील संघाच्या अध्यक्षपदी अॅड.मनसबदार



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२५ एप्रिल**

माजलगाव वकील संघाची वार्षिक निवडणुक २०२५/२६ करीता निवडणुक प्रक्रियेस दि.१६ एप्रिल पासून सुरुवात झाली असून.अध्यक्ष पदासाठी ४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते.दि.२४ रोजी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असल्याने ३ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने वकिल संघाच्या अध्यक्ष पदी ड.कजिम मनसबदार (सिद्दीकी) यांची बिनविरोध निवड करण्यात आली.तर उपाध्यक्ष व सचिव पदासाठी दि.२८ रोजी मतदान असणार आहे.

अॅड.मनसबदार यांची निवड झाल्याबद्दल त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी वकिल संघाचे सिनियर अॅड.बि.आर.डक, अॅड.व्ही.व्ही.फपाळ, अॅड.एस.ए.सुतळे, अॅड.टि.एन. कोल्हे, अॅड.ए.डी. घाडगे, ड.पी.पी.गोंडे, अॅड.विजय मस्के यांच्यासह आदी उपस्थित होते.

# पंडित ढगे यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२५ एप्रिल**

तालुक्यातील घळाटवाडी ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी पंडित मरीबा ढगे यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.

माजलगाव येथील पंचायत समिती अंतर्गत ग्रामविकास अधिकारी म्हणून मागिल अनेक दिवसापासून पंडित ढगे हे कार्यरत आहेत. सर्वसामान्य लोकांच्या कामांना ते प्राधान्य देतात त्यांच्या या कार्याची दखल घेत जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाच्या वतीने ग्रामविकास अधिकारी पंडित मरीबा ढगे यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार जिल्हा परिषद पंचायत विभागाचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानोबा मोकाटे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका संगीतादेवी पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल त्यांचे सरपंच संगिता येताळ, उपसरपंच अनुपभाऊ घाडगे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, घळाटवाडी ग्रामस्थ व सर्व मित्रपरिवार व नातेवाईकातून अभिनंदन होत आहे.



# १५० वर्षाची परंपरा असलेला श्री.पापदंडेश्वराचा पालखी सोहळा सायंकाळी, आज महाआरती

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२५ एप्रिल**

तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथे १५२ वर्षांची परंपरा असलेला ग्रामदैवत श्री.पापदंडेश्वर पालखी सोहळ्यानिमित्त शुक्रवारी (ता.२५) सायंकाळी १२ वाजता सुरुवात होणार असून शनिवारी (ता.२६) दुपारी १ वाजता महाआरतीने संपन्न होणार आहे. या सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.



दिडशे वर्षांची परंपरा असलेला श्री.पापदंडेश्वर पालखी सोहळ्या निमित्त शुक्रवारी पासून अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व शिव कथेचा प्रारंभ झाला. या हरिनाम सप्ताहात किर्तन, भजन, काकडा,गाथा भजन आदि संपन्न झाले. शुक्रवारी सकाळी अंकिता माने यांच्या शिवकथेचा समारोप झाला, दुपारी वासू देवानंद महाराज टाकळीकर यांच्या काल्याच्या किर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता करण्यात आली तर मुख्य पालखी सोहळा शुक्रवारी रात्री १२ वाजता श्री.पापदंडेश्वर मंदिरातून निघणार असून रात्री पालखी मार्गावर भारुडे, शनिवारी सकाळी गवळणी, सोंगे व दुपारी महाआरती नंतर महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे. या पालखी सोहळ्यास व अखंड हरिनाम सप्ताहास पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन गावकऱ्यांनी केले आहे.

# सी. बी. एस. इनामदार (नाहोलीकर)यांच्या वाढदिवसानिमित्त ढकली व्हालीबॉल स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२५ एप्रिल**

केज तालुक्यातील नाहोली मुळगाव असलेले सेवानिवृत्त नायब तहसीलदार तथा किसान सेलचे जिल्हाध्यक्ष सी.बी.एस. इनामदार यांच्या वाढदिवसानिमित्त प्रा. युवराज मगर मित्र मंडळ केज यांनी ढकली हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन केले आहे . या स्पर्धेत यशस्वी आठ संघास बक्षीस मिळणार आहे.



या स्पर्धेचे उद्घाटन बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे हे शुक्रवार दि.२५-४-२०२५ रोजी सायं ७-०० पंचायत समिती मैदान केज येथे करणार आहेत.

सी. बी. एस. इनामदार हे शासकीय सेवेत असताना शासनाच्या योजना सर्वसामान्य, गोरगरीब, शेतकरी लोकापर्यंत पोहोचण्यासाठी खूप मोठे योगदान दिले आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून खंडपीठात याचिका दाखल करून ८० लाख शेतकऱ्यांना लाभ मिळवून दिला.

या कार्यक्रमास मा.आ. पृथ्वीराज साठे सह राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्रजी पवार) पक्षाचे असंख्य कार्यकर्ते हजर राहणार आहेत तरी सर्वांनी या कार्यक्रमास हजेरी लावावी असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी( शरदचंद्रजी पवार) गटाने केले आहे

# टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक मधील १५० विद्यार्थ्यांची इंटर्नशिप व प्लेसमेंटसाठी नामांकित कंपन्यांमध्ये थेट निवड

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२५ एप्रिल**

विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये आवश्यक असणाऱ्या उच्च दर्जाचे प्रशिक्षण देवून अभियंता (इंजिनियर) घडविणाऱ्या टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक मधील १५० विद्यार्थ्यांची आकर्षक पॅकेजवर कमिन्स इंडिया प्रा.लि (पुणे), मायेडा इंडिया प्रा.लि (अहिल्यानगर), तसेच धूत ट्रान्समिशन, बजाज ऑटो, एन.आर.बी.बियरिंग्स आणि पर्स्किऑन इंडिया प्रा.लि सर्व छत्रपती संभाजीनगर या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली असल्याची माहिती टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.एल.व्ही.बगले यांनी दिली आहे.

या विद्यार्थ्यांच्या निवडीबाबत अधिक माहिती देताना प्राचार्य बगल म्हणाले की, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या सर्व सन्माननीय अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सर्व पदाधिकारी आणि कार्यकारिणी सदस्य व प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी यांच्या मार्गदर्शनाखाली टी.बी.गिरवलकर हे ग्रामीण भागातील उत्कृष्ट पॉलिटेक्निक ठरले आहे. राष्ट्रीय स्तरांवरील अनेक मानांकने या संस्थेने मिळविली असून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबर त्यांच्या नोकरीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जात आहेत. आपल्या पॉलिटेक्निक संस्थेमध्ये स्वतंत्र ट्रेनिंग एँड प्लेसमेंट विभाग कार्यरत असून या विभागाच्या वतीने देशातील विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर करार (टायअप) करण्यात आलेला आहे. यामुळे अनेक कंपन्या संस्थेमध्ये येऊन विद्यार्थ्यांचे कॅम्पस इंटरव्ह्यूव घेत असतात. यावर्षीच्या कॅम्पस इंटरव्ह्यूव मध्ये. कमिन्स इंडिया प्रा.लि (पुणे), मायेडा इंडिया प्रा.लि (अहिल्यानगर), तसेच धूत ट्रान्समिशन, बजाज ऑटो, एन.आर.बी.बियरिंग्स आणि पर्स्किऑन इंडिया प्रा.लि सर्व छत्रपती संभाजीनगर या सारख्या विविध कंपन्यांनी संस्थेमधील मेकॅनिकल इंजिनियरींग, इलेक्ट्रिकल इंजिनियरींग, कॉम्प्युटर इंजिनियरींग अशा विविध शाखांमधील डिप्लोमा व बी.टेक.धारक १५० विद्यार्थ्यांची आकर्षक पॅकेज व मासिक पगारावर थेट नोकरीसाठी निवड केली आहे. अनेक विद्यार्थ्यांची तर एकाचवेळी दोन-दोन कंपन्यांत निवड झाली आहे. जेवढ्या विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या ते सर्वच १५० विद्यार्थी इंटर्नशिप व प्लेसमेंटसाठी निवडले गेले आहेत. एकूण काय तर विद्यार्थ्यांचे शंभर टक्के प्लेसमेंट झाले आहे. या कॅम्पस इंटरव्ह्यूव आयोजनासाठी टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे ट्रेनिंग एँड प्लेसमेंट विभागप्रमुख व्ही.व्ही.कन्नुर, श्रीमती एस.ए.कुलकर्णी, आर.एस.डबीर यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या विविध कंपनीमध्ये थेट निवडीबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या सर्व सन्माननीय अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सर्व पदाधिकारी आणि कार्यकारिणी सदस्य व मार्गदर्शक प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी, अंबाजोगाई अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रावबावळे आदींसह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल समाधान व्यक्त करून आमच्या प्रतिनिधीशी बोलताना टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.एल.व्ही.बगले यांनी सांगितले की, इंटर्नशिप व प्लेसमेंटसाठी गिरवलकर पॉलिटेक्निकच्या या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, तांत्रिक कौशल्य, व्यक्तिमत्व यांचा सारासार विचार करून निवड केली आहे. टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरता दिले जाणारे वैयक्तिक लक्ष, शिस्त, पालकांशी संवाद आणि प्लेसमेंटसाठी विद्यार्थ्यांची करून घेतली जाणारी विशेष तयारी यामुळे या कॉलेज मधील विद्यार्थी नेहमीच कॅम्पस इंटरव्ह्यूव मधून विविध राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवडले जात असतात. प्लेसमेंटसाठी जिल्ह्यात नेहमीच अग्रेसर असलेले गिरवलकर पॉलिटेक्निक कॉलेज नेहमीच उत्कृष्ट निकाल, प्लेसमेंट, शिस्त आणि संस्कार यासाठी विद्यार्थी व पालक यांच्या कौतुकास पात्र ठरत आहे. गिरवलकर पॉलिटेक्निक कॉलेज मध्ये असणारे अनुभवी शिक्षक, सर्व साहित्यांनी सुसज्ज प्रयोगशाळा, वर्कशॉप, लैंग्वेज लॅब, सुसज्ज ग्रंथालय, प्रशस्त इमारत, भव्य क्रिडांगण, विविध प्रकारच्या उपक्रम व स्पर्धांचे आयोजन, सर्व सोयी सुविधांनी युक्त वसतीगृह, पर्यावरणपूरक परिसर व संपूर्ण वर्षभर एक्स्ट्रा करिक्युलर ऍक्टिव्हिटीजवर दिला जाणारा भर यामुळे गिरवलकर पॉलिटेक्निक या कॉलेज मधून बाहेर पडणारे विद्यार्थी हे इंडस्ट्री रेडी म्हणूनच बाहेर पडतात व देश-विदेशातील नामवंत कंपन्यांमध्ये त्यांची निवड होते. पदविका अभ्यासक्रम पूर्ण करण्यापूर्वीच म्हणजे अंतिम वर्षांत असतानाच विद्यार्थ्यांची या नामवंत कंपन्यांमध्ये झालेली निवड यामुळे विद्यार्थी व पालक वर्ग यामधून समाधान व्यक्त केले जात आहे. गिरवलकर पॉलिटेक्निक कॉलेजच्या यशात सर्व विद्यार्थ्यांचे प्रयत्न, त्यांचे पालक यांचा विश्वास आणि विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सातत्यपूर्ण योगदान आहे. अशी माहिती टी.बी.गिरवलकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा.एल.व्ही.बगले यांनी दिली आहे.



# मोदी ज्वेलर्सच्या नथ महोत्सवाने अक्षय्य तृतीया होणार आणखीन रंगतदार

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२५ एप्रिल**

अक्षय्य तृतीया हा स्त्रियांसाठी सोने खरेदीसाठी अतिशय महत्त्वाचा सण आहे. यानिमित्ताने अंबाजोगाई शहरात मोदी ज्वेलर्सच्या अक्षय्य तृतीया निमित्त खास महिलांसाठी अतिशय पारंपरिक अशा नथ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मोदी ज्वेलर्सचे संचालक भूषण मोदी यांनी दिली आहे. अक्षय्य तृतीयेला खरेदी केलेले सोने हे कायम टिकते अशी आपली तथाभारतीय महिलांची धारणा आहे. स्त्रियांसाठी दागिने हा अगदी जिव्हाळ्याचा विषय तर आहेच त्याचबरोबर त्याचे गुंतवणूक मूल्यही खूप मोठे असल्याचे मानले जाते.म्हणूनच इतर सर्व प्रकारच्या दागिन्यांसमवेत मोदी ज्वेलर्सने खास नथ महोत्सव जाहीर केला आहे.

नथ म्हणजे प्रत्येक स्त्रीसाठी अभिमानाचा आणि मराठी संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे. अंबाजोगाईमध्ये प्रथमच होणाऱ्या या महोत्सवात नथीचे विविध प्रकार जसे मराठा नथ, पिकॉक नथ , कारवारी नथ , स्टोन नथ , जिजाऊ नथ , बानू नथ, म्हाळसा नथ, कास्टिंग नथ,

पेशवाई नथ, जोधा अकबर नथ, डायमंड नथ अशा विविध व्हरायटीज पहायला मिळणार आहेत. पारदर्शी व्यवहार तसेच अगदी आपल्या बजेटमध्ये बसणाऱ्या सोन्या चांदीच्या दागिन्यांची लेटेस्ट व्हरायटीज आणि आपुलकीची सेवा यामुळे मोदी ज्वेलर्सला ग्राहकांची पसंती मिळते आहे.यंदाही अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर सोने खरेदीसाठी पेढीला आणि नथ महोत्सवाला ग्राहकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी असे आवाहन मोदी ज्वेलर्स च्या वतीने करण्यात आले आहे

# प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घ्यावा- आ.विजयसिंह पंडित

**ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून किंवा सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी ३० एप्रिल पर्यत करून घ्यावी**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२५ एप्रिल**

प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सद्या सर्व्हे सुरु असून गेवराई विधानसभा मतदार संघातील नागरिकांनी सद्या सुरू असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात केले आहे.

प्रसिद्धी पत्रकात पुढे ते म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी गेवराई विधानसभा मतदारसंघात सद्या सर्व्हे सुरु आहेत. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकता. एक ते दहा निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेत आपली नोंदणी करावी. नोंदणी करण्यासाठी ३० एप्रिल ही शेवटची तारीख असून त्या अगोदर गेवराई विधानसभा मतदार संघातील नागरिकांनी आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

अशी करावी नोंदणी

सेल्फ सर्व्हे करण्यासाठी aawas plus २०२४ हे शासनाचे अधिकृत अँप प्ले स्टोअर्सवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टोल करावे. नंतर ररवहरी ऋलश ीव अँप देखील इंस्टॉल करून घ्यावे. त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून अँपवर विचारलेली माहिती भरून शेवटी आपल्या कच्च्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा. आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पाच लाख लाभार्थ्यांची ई-केवायसीकडे पाठ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ एप्रिल -** शहरासह जिल्ह्यातील रेशन कार्डधारकांना अन्न सुरक्षा व अंत्योदय योजनेतून मोफत धान्याचा लाभ दिला जातो. खरे लाभार्थी शोधण्यासाठी केंद्र सरकारने ई-केवायसी करण्याचे धोरण सुरू केले आहे. लातूर जिल्ह्यात आतापर्यंत ७४ टक्के नागरिकांची ई-केवायसी पूर्ण झाली आहे. अद्यापही २६ टक्के नागरिकांची केवायसी बाकी आहे. ज्यांची बाकी आहे, अशा नागरिकांचे मोफत रेशन आता बंद होणार आहे. एकूण १८ लाख २७ हजार ४०१ पैकी अद्याप ४ लाख ७९ हजार ४६ जणांची केवायसी अपूर्ण आहे.

लातूर जिल्ह्यात एकूण १८ लाख लाभार्थ्यांना मोफत रेशन देण्यात येते. यातील सर्वच लाभधारक रेशन घेतात का, याची पडताळणी करण्यासाठी केंद्र सरकारने ई-केवायसी करण्यास सुरुवात केली आहे. लातूर जिल्ह्यात आतापर्यंत १८ लाख २७ हजार ४०१ पात्र लाभार्थ्यांपैकी १३ लाख ४८ हजार ३५५ लाभार्थ्यांनी ई-केवायसी पूर्ण करून घेतली आहे.

अद्यापही २६ टक्के कार्डधारकांची ई-केवायसी अपूर्ण आहे. ३० एप्रिलपपर्यंत केवायसी करण्याची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर मात्र ज्यांची केवायसी अपूर्ण आहे, अशा लाभार्थ्यांचा मोफत धान्य पुरवठा बंद करण्यात येणार आहे. नागरिकांना आता घरबसल्याही ई-केवायसी करता येणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी येत्या पाच दिवसांत केवायसी पूर्ण करून घेऊन आपले मोफत धान्य सुरू ठेवावे, असे आवाहन लातूरचे जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### जिल्ह्यातील ४३० हज यात्रेकरूंचे लसीकरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ एप्रिल -** हज यात्रेसाठी निघालेल्या भाविकांसाठी आरोग्य विभाग व हज कमिटीच्यावतीने मंगळवारी लसीकरण शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ४३० भाविकांना मेंदूज्वर लस देण्यात आली.

यावेळी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधीष्ठाता डॉ. उदय मोहिते, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव, डॉ. संतोषकुमार डोपे, मौलाना शौकत अली व हज कमिटीचे प्रशिक्षक सय्यद मुक्तेदर अली इनामदार, सय्यद महेफूज अली आदी उपस्थित होते.

### उत्पादन शुल्क विभागाला २६ कोटी ४० लाखांचा महसूल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ एप्रिल -** राज्य सरकारचा महसूलला फाटा देत अवैध मार्गाने दारु विक्रीच्या अनेक घटना समोर येतात. गेल्या वर्षभरात अशा एक हजारहून अधिक जणांवर कारवाई करण्यात आली असून या माध्यमातून येथील उत्पादन शुल्क विभागाने २६ कोटी ४० लाखाचा महसूल राज्य सरकारला मिळवून दिला आहे. शिवाय जिल्ह्यातील ५ बार-परमिटचा दारु पुरवठाही बंद करण्यात आला आहे.

सन २०२४-२५ या वर्षात परवान्यांचे नुतनीकरण, कलम ९३ अंतर्गत कारवाई, विभागीय गुन्ह्यांतील दंडाची रक्कम अशा कारवयातून कोट्यावधींचा महसूल जमा करण्यात आला होता. अवैध दारु विक्री विरोधात १ हजार २८३ केसेस करण्यात आल्या होत्या तर या कारवाईत १ हजार ३१३ जणांना अटक करण्यात आली होती. या विभागाचे अधीक्षक केशव राऊत व उप-अधीक्षक एम.जी. मुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे अन्वेषणाच्या मोहिमा जिल्ह्यात राबविल्या जात आहेत. शहरासह ग्रामीण भागात कारवयांमध्ये सातत्य राहिल्याने एवढ्या मोठ्या प्रमाणात महसूल सरकारला मिळालेला आहे. जिल्ह्यात ७१४ परमिट अॅण्ड बिअर बार, १०० देशी दारुचे दुकाने, ७६ बिअर शॉपी तर ११ वाईन शॉप आहेत. या व्यतिरिक्त ढाबे आणि चोरट्या पद्धतीने दारु विक्री केली जाते. अशाच पद्धतीच्या १ हजार २८३ केसेस या विभागाकडून करण्यात आल्या आहेत. मार्चनंतर ग्रामीण भागातील ५ बार अॅण्ड परमिट रुम धारकांनी परवाना नुतनीकरणाची फीस अदा न केल्याने त्यांचा पुरवठा बंद करण्यात आला आहे.

### विद्यापीठाच्या ऑनस्क्रीन पेपर तपासणीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ एप्रिल -** दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या ऑनस्क्रीन मूल्यांकन (ई-कॅप) सेंटरमध्ये दि.१५ एप्रिल २०२५ पासून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेडच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी-२०२५ परीक्षेच्या पदवी अभ्यासक्रमाच्या उत्तरपुस्तिकांचे ऑनस्क्रीन मूल्यांकनाचे कार्य सुरळीतपणे सुरू झालेले आहे.

यावर्षी बी.एस्सी.पदवीच्या उत्तरपुस्तिकेचे ऑनस्क्रीन मूल्यांकन प्रथमच केले जात आहे.सदरील उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर,विशेष कार्यासन अधिकारी दिगंबर नेटके,प्रभारी संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ हुशारसिंग साबळे यांच्या सुचनेनुसार दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या ई-कॅप सेंटरमध्ये उत्तमरित्या तयारी करण्यात आलेली आहे.

त्यामुळे लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या महाविद्यालयातील प्राध्यापक दयानंद विज्ञानच्या ई-कॅप सेंटरमध्ये उस्फूर्तपणे ऑनस्क्रीन मूल्यांकनाचे कार्य कर्तव्यदक्षपणे करीत आहेत.ऑफलाईन मूल्यांकनापेक्षा ऑनस्क्रीन मूल्यांकनाचे कार्य अतिशय सुलभ असल्यामुळे वेळेची बचत,कमी खर्च,बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानाचा योग्य वापर, विश्वसनीयता, विद्यार्थ्यांचे हित,निकाल लवकर लागणे,उत्तरपुस्तिका मूल्यांकनातील संगणक हाताळणी सुलभता असे ऑनस्क्रीन मूल्यांकनाचे बरेच फायदे होणार आहेत.

या पद्धतीमध्ये पेपर तपासणी केल्यामुळे बऱ्याचशा गोष्टी या संगणकाच्या मदतीने होणार आहेत,त्यामुळे चुका होणार नसल्याचे प्राध्यापकांकडून सांगितले जात आहे.दयानंद विज्ञानच्या अद्ययावत संगणक व उत्तम नियोजनावर सर्व प्राध्यापकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# पाण्याचा पिवळसरपणा कमी, स्वच्छ पाण्याचा पुरवठा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ एप्रिल -** महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून हरंगुळ येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाण्याचे शुद्धीकरण करून नागरिकांना स्वच्छ पाण्याचा पुरवठा केला जात असल्याची माहिती महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आली.

लातूर शहराला धनेगाव येथील मांजरा प्रकल्पातून पाणीपुरवठा होतो. धरणातून उचललेले पाणी हरंगुळ येथील जलशुद्धीकरण केंद्रात आणले जाते. पाटबंधारे विभागाच्या वतीने सध्या कालव्याच्या माध्यमातून शेतीसाठी पाण्याचे वितरण सुरू आहे. सध्या तापमानही प्रचंड वाढलेले आहे. या तापमानामुळे पाण्याची पातळी घटत आहे. पाण्यात विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत आहे. यामुळे शेवाळ निर्मितीची प्रक्रिया जलद



गतीने होते. हे पाणी क्लोरीनच्या सानिध्यात आल्यानंतर काही वेळा त्याचा रंग जास्त पिवळसर होतो. महानगरपालिकेच्या वतीने हरंगुळ येथील जलशुद्धीकरण केंद्रात ब्लिचिंग पावडर, तुरटी, क्लोरीन गॅस, तसेच पीएसी पावडरचा वापर करून पाणी शुद्ध केले जाते. पाण्याचा पिवळसरपणा कमी केला जातो. हेच पाणी शहरात पुरवठा केले जात आहे. मांजरा प्रकल्पावरून हरंगुळ जलशुद्धीकरण केंद्रात केला जाणारा पाणीपुरवठा सध्या जॅकवेलच्या खालच्या गेटमधून केला जात आहे. शेवाळमिश्रित व इतर जैविक मटेरियलमुळे पाणी पिवळसर होऊन ते जलशुद्धीकरण केंद्रात येत आहे. जॅकवेलचे खालचे गेट बंद करून वरील बाजूच्या गेटमधून पाणीपुरवठा

करण्याची उपाययोजना महापालिकेच्या वतीने केली जात आहे. हरंगुळ येथील जलशुद्धीकरण केंद्रात आलेले पाणी स्थिर व्हावे, यासाठी सध्या शहरात चार दिवसांऐवजी सात दिवसांना पाणीपुरवठा केला जात आहे. मांजरा धरणातून पाणीपुरवठा होणाऱ्या सर्वच शहरांमध्ये सध्याही समस्या जाणवत आहे. महानगरपालिकेने निरी या संस्थेने सूचविलेल्या उपाययोजना अंमलात आणल्या आहेत. सद्यस्थितीत शहरात नळाला येणारे पाणी शुद्ध आहे. या पाण्याची जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेकडून दैनंदिन तपासणी केली जाते.

नळाला येणारे पाणी पिण्यासाठी योग्य असून त्यामुळे आरोग्याला काहीही धोका नाही, असे महापालिकेने प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

# १९५ वीजग्राहकांना मिळाली स्मार्ट बक्षिसे



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ एप्रिल -** महावितरणच्या लकी डिजीटल ग्राहक योजनेचा पहिला लकी ड्रॉ ऑनलाईन पध्दतीने दि. ७ एप्रिल रोजी काढण्यात आला होता. या 'लकी ड्रॉ' मधील विजेत्यांना स्मार्ट फोन व वॉचचे वाटप मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्युत भवन येथील येथे लेखा व वित्त विभागाचे वरिष्ठ व्यवस्थापक जालींदर मंगळवेढेकर, कार्यकारी अभियंता गणेश सामसे. अतिरिक्त कार्यकारी अभियंता ज्योती कुमठेकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुबोध डोंगरे, व्यवस्थापक लेखा आदित्य पाटील, दयानंद बनसोडे तसेच दिनेश ठाकूर यांच्या प्रमूख उपस्थितीत प्रातिनिधिक स्वरूपात मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांच्या हस्ते विजेते सुकेशना कांबळे, नियामत हांसुरे, अभिमन्यू पाटील, बालाजी व्यवहारे आणि तुकाराम जाधव यांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले.

उर्वरीत विजेत्यांना त्या-त्या उपविभाग कार्यालयात वाटप करण्यात येत आहे. लातूर परिमंडळातील प्रत्येक उपविभाग स्तरावर एक या प्रमाणे पहिल्या क्रमांकाकरिता ३९ विजेत्या ग्राहकांना सॅमसंग कंपनीचा स्मार्ट फोन बक्षिस म्हणून दिले जात आहे. तर प्रत्येक उपविभागात प्रत्येकी दोन प्रमाणे दुसऱ्या क्रमांकासाठी ७८ विजेत्या ग्राहकांना एमआय कंपनीचा स्मार्ट फोन व प्रत्येकी दोन प्रमाणे तिसऱ्या क्रमांकासाठी ७८ विजेत्या वीजग्राहकांना फास्टट्रॅक कमपनीचे स्मार्ट वॉच बक्षिस म्हणून दिले जात आहे. यापुढील लकी ड्रॉ ७ मे ला काढण्यात येणार आहे. ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते.

परिणामी सध्या राज्यात ७० टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे तीनपेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील असे कळविण्यात आले आहे.

# महात्मा बसवेश्वर महाराज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ एप्रिल -** लिंगायत महासंघाच्या विविध शाखेच्यावतीने येत्या ३० एप्रिल रोजी महात्मा बसवेश्वर महाराजांच्या जयंतीनिमित्त लातूर जिल्ह्यातील विविध ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील व जिल्हाध्यक्ष करीबसेश्वर पाटील यांनी सांगितले.



लिंगायत महासंघाच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा. सुदर्शन बिरादार यांच्या नेतृत्वाखाली महात्मा बसवेश्वर महाराज जयंतीनिमित्त जिल्हाभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त ३० एप्रिल २०२५ रोजी लातूर येथे सकाळी प्रसादाचे वाटप, रक्तदान शिबिर तसेच व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. २०० जणांना समग्र महात्मा बसवेश्वर ग्रंथांचे वितरण करण्यात येणार आहे. उदगीर येथे प्रसादाचे वाटप व रक्तदान शिबिर, निलंगा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करून प्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील १०० महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव समित्यांना पुढील पंधरा दिवसांत प्रांताध्यक्ष प्रा. बिराजदार हे भेटी देऊन करणार मार्गदर्शन आहेत. प्रत्येक ठिकाणच्या जयंतीचे नियोजन हे तेथील अध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष आणि सर्व प्रमुख पदाधिकारी करणार आहेत, अशी माहिती लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस कालापाटील यांनी दिली आहे.

### प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ एप्रिल -** दयानंद कला महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या कार्याचा गौरव करून दयानंद शिक्षण संस्थेने त्यांना तीन वर्ष मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविला होता. त्यानुसार प्रस्तावास शासन मान्यता मिळाली. या मुदतवाढीबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, ललितभाई शाह, रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव अॅड. श्रीकांत उटगे सहाय्यक सचिव अजिंक्य सोनवणे, कोषाध्यक्ष संजय बोरा तसेच अॅड आशिष बाजपाई यांनी त्यांचा सत्कार केला.

# अवैध सावकारी विरोधातील तक्रारी निघणार निकाली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ एप्रिल -** अवैध सावकारीच्या विरोधात लातूर पोलीस दलाने एक अभिनव उपक्रम सुरु केला आहे. यापूर्वी दि. १९ एप्रिल रोजी झालेल्या तक्रार निवारणाच्या दिवशी ९ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यावर कारवाई सुरु असून आता उद्या अवैध सावकारीच्या विरोधात तक्रार निवारण दिन पार पडणार आहे.

वेळेवर आर्थिक मदत मिळत नसल्यास अनेकजन इच्छा नसतानाही खाजगी सावकाराकडून चक्रवाढ व्याज दराने पैसे घेवून सावकारीच्या विळख्यात फसतात. त्यामुळे सावकाराच्या वसुलीचा सामनाही करावा लागतो. यातूनच मग सावकाराकडून कर्ज वसुल करताना विनयभंग, सावकाराला घाबरून आत्महत्या, सावकाराकडून घेतलेल्या पैशातून जुगार, व्यसनातून नैराश्याच्या गर्तेत अडकणे असे प्रकार घडतात परंतु सर्वसामान्य माणुस कर्जाच्या डोंगराखाली दबून जातो.

यासाठी अवैध सावकारीमुळे पिडीत नागरीकांसाठी मध्यंतरी विवेकानंद चौक पोलीस स्टेशन याठिकाणी तक्रार निवारण दिन ठेवण्यात आलेला होता. सदर दिवशी अवैध सावकारी विरुद्ध एकूण ९ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या तक्रारीवर कार्यवाही सुरू आहे. आता आज तक्रार निवारण दिन गांधी चौक पोलीस ठाण्यात सकाळी १०.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत होणार आहे. पिडीत नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# काँग्रेसने केला दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ एप्रिल -** जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे भारतीय पर्यटकांवर झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात बळी गेलेल्या निरपराध नागरिकांना जिल्हा काँग्रेस कमिटीकडून राष्ट्रपिता महात्मा गांधी चौक याठिकाणी मेणबत्ती प्रज्ज्वलित करून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.




जम्मू-काश्मीरच्या पहलगाम भागात दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला. ज्यात पर्यटनासाठी आलेल्या २८ निष्पाप भारतीय पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर अनेक पर्यटक, स्थानिक व्यावसायिक, नागरिक जखमी झाले.

या हल्ल्याने संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली असून, या घटनेबाबत देशभरातून तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. केंद्र सरकारने पहलगामसह जम्मू-काश्मीरमधील सर्व पर्यटन स्थळांची सुरक्षा व्यवस्था अधिक चोख करावी, दहशतवाद्यांना धडा शिकवावा, असा आग्रह काँग्रेसने केंद्र सरकारकडे धरला आहे.

यावेळी गोरोबा लोखंडे, प्रा. सुधीर अनवले, प्रा. प्रवीण कांबळे, दगडूप्पा मिटकरी, अॅड. देवीदास बोरुळे, व्यंकटेश पुरी, प्रवीण सूर्यवंशी, आसीफ बागवान, नागसेन कामेगावकर, दत्ता सोमवंशी, अॅड. अंगद गायकवाड, तबरेज तांबोळी, भाऊसाहेब भडीकर, बिभीषण सांगवीकर, जमालोद्दीन मनियार, अराफत पटेल, खाजापाशा शेख, पवनकुमार गायकवाड, फारूख शेख, नितीन कांबळे, जुनेद शेख, पिराजी साठे, मारुती चव्हाण, राहुल देशमुख, किरण बनसोडे, बब्रुवान गायकवाड, अहेमद बागवान, करीम तांबोळी, शोभा ओहळ यांच्यासह काँग्रेस पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी, सदस्य, नागरिक उपस्थित होते.

# एक नंबर चौक ते सुभेदार रामजीनगर रस्ता कामाला सुरुवात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ एप्रिल -** माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे प्रलंबित असलेल्या लातूर शहरातील एक नंबर चौक ते सुभेदार रामजीनगरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाला गुरुवारी सुरूवात करण्यात आली आहे.

आमदार अमित देशमुख यांच्या विशेष प्रयत्नातून राज्य शासनाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसूचित जाती व नवबौध्द वस्ती सुधार योजनेंतर्गत इंडियानगर भागात २०२१-२२ मध्ये नाला मंजूर करण्यात आला होता. मात्र, स्थानिक नागरिकांची होणारी गैरसोय व त्यांच्या मागणीस्तव नाल्याऐवजी शहरातील रस्त्यांची कामे प्रस्तावित करण्यात आले.

या रस्ता कामाच्या मागणीचा विचार करून २७ मे २०२२ च्या प्रशासकीय मान्यतेस सुधारित



प्रशासकीय मंजुरी १० फेब्रुवारी २०२३ रोजी घेण्यात आली. त्यात एक नंबर चौक ते सुभेदार रामजीनगरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामालाही मंजुरी घेण्यात आली.

मात्र, सदरील काम काही तांत्रिक अडचणीमुळे मागील काही दिवस प्रलंबीत राहिले.

दरम्यान, आमदार देशमुख यांनी संबंधित कामाबाबत शासन स्तरावर बैठक घेऊन सदरील काम तत्काळ सुरू करण्याचे आदेश महापालिका प्रशासनास दिले होते. त्या अनुषंगाने शहरातील एक नंबर चौक ते सुभेदार रामजीनगरकडे जाणाऱ्या रस्ता कामाची सुरूवात गुरुवारी नारळ वाढवून करण्यात आली. याबद्दल स्थानिक नागरिकांनी काम सुरू झाल्याबद्दल आमदार अमित देशमुख यांचे आभार मानले आहेत. दरम्यान, या कामाचा शुभारंभ माजी महापौर अॅड. दीपक सूळ, प्रभाग क्रमांक ११ चे निरीक्षक डॉ. बालाजी सोळुंके, प्रभाग क्रमांक १० चे निरीक्षक बालाजी मुस्कावाड, माजी नगरसेवक आकाश भगत, रत्नदीप अजनीकर, मनोज देशमुख, प्रा. प्रवीण कांबळे, आनंद वैरागे, प्रा. शिवशरण हावळे, भीमराव मस्के यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला.

यावेळी रफिक करकम, अजय सूर्यवंशी, साजिद शेख, कमलाकर सुरवसे, राजू ढाले, गोविंद गायकवाड, बाळू गायकवाड, सतीश ढाले, दयानंद कांबळे, सुरेश बनसोडे, समशेर पठाण, समीर शेख, अभंग कांबळे, आशा कांबळे यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# 'एमआयटी'त राज्यस्तरीय 'स्पंदन' नृत्य कला महोत्सव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ एप्रिल -** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आणि माईर पुणे संचलित महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्पंदन २०२५' या दोन दिवसीय राज्यस्तरीय नृत्य कला महोत्सवाचे शनिवार, २६ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी दिली आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरु लेफ्टनंट जनरल माधुरी कानिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, समन्वयक डॉ. सुनील फुगारे आणि विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. देवेंद्र पाटील यांची उपस्थिती लाभणार आहे. महोत्सवाचा मुख्य आकर्षण बिंदू म्हणजे नृत्य स्पर्धा असून, यात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्न राज्यभरातील वैद्यकीय, आयुर्वेद, दंत, होमिओपॅथी, फिजिओथेरपी, नर्सिंग आणि इतर आरोग्य शिक्षण संस्थांतील विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपली नृत्य कला, सृजनशीलता आणि सांस्कृतिक जाणीव सादर करण्याची संधी मिळणार आहे.

'स्पंदन २०२५' नृत्य कला महोत्सव विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक अभिरुची वृध्दिंगत करण्याबरोबरच एकात्मता आणि सामूहिक सहभागाचे प्रतीक ठरणार आहे. या महोत्सवाचे समन्वयक म्हणून डॉ. शीतल फड आणि डॉ. सलीम शेख हे काम पाहणार आहेत.

या राज्यस्तरीय नृत्य कला महोत्सवात महाराष्ट्रातील सर्व वैद्यकीय व आरोग्य शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड व प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांनी केले आहे.



नांदेड



नवीन नांदेड



मुदखेड

# पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ नरसीत मुस्लीम समाजाचा मोर्चा



**तभा वृतसेवा**
**नरसी, दि.२५ एप्रिल-**

कश्मीर मधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या भ्याड आतंकवादी हल्ल्याच्या निषेधार्थ नरसी येथील मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने शुक्रवारी प्रचंड निषेध मोर्चा काढण्यात आला.त्या क्रूर दहशतवाद्याना तात्काळ यमसदनी पाठवा अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.

भारताचे नंदनवन असलेल्या कश्मीर मध्ये पर्यटनास गेलेल्या यात्रेकरुवर २२ एप्रिल रोजी पहलगाम येथील बैसावर पॉईंट वर आतंकवाद्यानी अमानुष गोळीबार केला.या क्रूर हल्ल्यात एकूण २६ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला.त्यात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश आहे. या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी नरसीत तमाम मुस्लिम समाजाच्या पुढाकाराने प्रचंड निषेध मोर्चा काढण्यात आला.निषेधाचे फलक हाती घेवून शेकडो मुस्लिम युवक या मोर्चात सहभागी झाले होते. नरसी चौरस्त्यावरील चारही मार्गावर फिरून येथील पोलीस चौकी समोर मोर्चाचे समापन करण्यात आले.निष्पाप बांधवांना गोळ्या घालणाऱ्या क्रूर दहशत वाद्याना सरकारने तात्काळ यमसदनी धाडावे अशा आशयाचे निवेदन यावेळी प्रशासनास देण्यात आले. या निषेध मोर्चा प्रसंगी रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# कश्मीर येथील दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ किनवट कडकडीत बंद

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२५ एप्रिल-**

काश्मिर खो-यातील पहलगाम येथे दि.२२ एप्रिल रोजी पर्यटकांवर झालेल्या दहशदवादी हल्ल्याचा रोष देशभरात वाढत असुन याच अणुषंगाने दिनांक २५ रोजी भारतीय जनता पक्षाने किनवट व गोकुंदा शहर बंद पुकारला होता, नागरीकांचा रोष पाहता बंदला सर्व पक्षांसह विविध व्यापारी संघटनांनी पाठींबा जाहीर करुन आजचा बंद १०० टक्के यशस्वी केला.

दहशदवाद्यांनी केलेला हा हल्ला केवल पर्यटकांवरील हल्ला नसुन तो देशावर केलेला हल्ला आहे. असा सुर आज आयोजित बंद दरम्यान नागरीकांचा होता तर सर्व पक्षीय बंद असल्याने सकाळपासुन कोणत्याही प्रकारचे आस्थापना उघडल्या नाही. यामुळे बाहेरगावावरुन आलेल्या प्रवाशांना चहापान न मिळाल्याने काही अंशी त्रास झाला. सकाळी ९ वाजता सर्व पक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते हे शहरातील जिजामाता चौक येथे एकत्र येत मोठ्या उद्वेगाने घोषणा दिल्या. त्यानंतर सदर जमाव हा शहरातुन व गोकुंदा पर्यंत पायी यात्रा करत बंद चे शांततेत आवाहन केले. यामुळे गोकुंदा शहर, किनवट शहर कडकडीत बंद होते, अत्यावश्यक सेवा जसे कि, रुग्णालय,औषधी दुकाना शिवाय कोणत्याही आस्थापना उघडल्या नव्हत्या. आज तहसिल कार्यालयात ग्राम पंचायत आरक्षण सोडत असल्याने ग्रामिण भागातील नागरीकांना चहा पान करण्यास शोधाशोध करावी लागली. बंद यशस्वी करण्यासाठी भाजपा, शिवसेना (शिंदे गट), रा.कॉ. पक्ष यांच्यासह हिंदुत्ववादी संघटनांनी सक्रीय सहभाग



नोंदवला होता. ज्यामध्ये सर्व धर्मिय देशप्रेमी नागरीक आणी व्यापा-यांचा सहभाग मोठ्या संख्येने होता.

यावेळी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, भाजपा शहर मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, उत्तर मंडळ अध्यक्ष उमाकांत कऱ्हाळे अशोक नेम्मानिवार, राघु मामा, सुरज सातुरवार, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष दिनकर चाडावार, सतिष नेम्मानिवार, सुगत नगराळे, शेखर चिंचोलकर, उषा धात्रक, प्रभावती भुरे, गंगुबाई परेकर, संगिता मंडारे, सतिष बिराजदार, शिवाजी आंधळे, शिवा क्यातमवार, सुनिल मच्छेवार, बालाजी धोत्रे, राहुल दारगुलवार, जय वर्मा, नरसिंग तक्कलवार, अजय कदम, कृष्णा इटकेपेलीवार, राकेश बोंपीलवार यांच्यासह विविध पक्ष संघटना व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.किनवट बंद दरम्यान उपविभागीय पोलीस अधिकारी मळघणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बिर्ला यांनी ठिकठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# तेलंगणातून बोगस खते; २२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.२५ एप्रिल-**

तेलंगणा राज्यातून विविध कंपनीचे बोगस खते आणून ते विनापरवाना विक्री करणाऱ्या गोदामावर पोलिसांनी छापा टाकून २२ लाख ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी तेलंगणातील तीन व हिमायतनगर येथील एकावर गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला.

शहरातील एका गोदामात बोगस खतांचा साठा करून त्याची विक्री केली जात असल्याची माहिती गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक तथा कृषी अधिकारी गंगाधर भदेवाड यांना मिळाली. त्यानंतर २४ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजूस असलेल्या पत्र्याच्या टिनशेडमध्ये छापा टाकला. यावेळी खुशी क्रॉप केयर कंपनीचे खते बोलेरो पिकअप (एमएच २६ बीई ३२९५) या वाहनातून विक्री करताना आढळून आले.

संबंधितांकडे खत विक्री परवाना, उगम प्रमाणपत्र तसेच कंपनी अधिकाऱ्याचे नाव व इतर कागदपत्रे आढळून आली नाहीत.

दरम्यान शहर व तालुका परिसरात मोठ्या प्रमाणात विनापरवाना अनधिकृतरीत्या खताची विक्री करण्याचे धाडस कोणाच्या मदतीशिवाय करणे शक्य नाही. त्यामुळे यामागे मुख्य सूत्रधार कोण? याचा शोध घेणे गरजेचे असल्याचे मत येथील कृषी व्यापारी संघटनेने व्यक्त केले आहे. हा गोरखधंदा चालवून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल झाला असला, तरी या धंद्याला अभय देणाऱ्या 'आका'चा शोध घेणे गरजेचे असल्याचे मत शेतकरीवर्गातून केली जात आहे.

बुधवारी रात्री उशिरापर्यंत पोलिस ठाण्यात कृषी व्यापारी तळ ठोकून होते. ६ दरम्यान, जप्त केलेला बोगस साठा हा राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या एका पदाधिकाऱ्याच्या मालकीच्या गोदामात होता. निर्मित केलेले ७ लाख ५९ हजार ४७२ रुपये किमतीचे खत गोडावूनमधून अनधिकृतपणे, विनापरवाना बोलेरो गाडीतून नेले जात होते.

कृषी अधिकारी भदेवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी करूपल्ली व्यंकण्णा (वय ४२, रा. मरली चमकोणिबावी), गुराम पोडे मंडल (रा. वटीकोडे, नालागोंडा), प्रवीण व्यंकय्या आडेप्पू (२२, रा. नालागोंडा), मलेश सत्यनारायण बोडला (३५, रा. हैदराबाद), ख्वाजा नसीर ख्वाजा वजीर (४२, रा. भोकर, हल्ली मुक्काम हिमायतनगर) या चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा तपास पोलिस निरीक्षक अमोल भगत करीत आहेत.

# पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ मुदखेड कडकडीत बंद

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२५ एप्रिल-**

पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ मुदखेड कडकडीत बंद पाळण्यात आला. दि २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीर मधील पहलगाम या ठिकाणी दहशतवादी हल्ला केला या हल्ल्यांमध्ये २७ निष्पाप लोकांनी आपले प्राण गमावले या हल्ल्यांमध्ये दहशतवाद्यांनी धर्म विचारून निरापराध लोकांना गोळ्या घातल्या या धर्मांध दहशतवादी नर पशूंच्या निषेधार्थ मुदखेड शहर बंद ठेवण्यात आले होते.विश्व हिंदू परिषद,बजरंग दल, हनुमान चालीसा समिती व सकल हिंदू समाजाच्या वतीने मुदखेड बंदची हाक दिली होती.

या घटनेच्या निषेध करण्यासाठी मुदखेड शहरातील सुभाष गंज मोंढा,छत्रपती शिवाजी नगर,सराफा लाईन,नांदेड रोड भागातील व शहरातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवत या घटनेचा निषेध केला.त्याचबरोबर एका निवेदनाद्वारे भारत सरकारला या दहशतवाद्यांचा व यांना आसरा देणाऱ्या पाकिस्तान वर कारवाही करावी पाक व्याप्त काश्मीर मुक्त करावे जेणेकरून दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट होतील,यावेळी पाकिस्थान विरोधात घोषणा बाजी देत,श्रद्धांजली वाहण्यात आली आणि या भ्याड हल्ल्याचे पाकिस्थान आणि दहशतवादीना चोख उत्तर देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी विश्व हिंदू परिषद बजरंग दल हनुमान चालीसा समिती व सकल हिंदू समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# नांदेड बदंला सिडकोत संमिश्र प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.२५ एप्रिल-**

पहलगाम येथे पर्यटकावर झालेल्या भ्याड हल्ल्याच् निषेधार्थ सहपक्ष पदाधिकाऱ्यांच्या वतीने २५ एप्रिल रोजी नांदेड बंदचे आवाहन करण्यात आले होते या आवाहनाला प्रतिसाद देत सिडकोतील व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने प्रतिष्ठाने बंद ठेवून नांदेड बंद मध्ये सहभागी जाईले.

जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला या हल्ल्यात सत्तावीस पर्यटक मृत्यूमुखी पडले या हल्ल्याच्या निषेधार्थ सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांच्या वतीने २५ एप्रिल रोजी नांदेड बंदीची हाक दिली होती सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांच्या आवाहन प्रतिसाद देत नांदेडच्या सिडको हाडको भागातील व्यापारी बांधवांनी बाजारपेठेतील आपापली दुकाने बंद ठेवून नांदेड बनला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. प्रारंभी हाडको बस स्टॅन्ड येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.त्यानंतर सर्व पक्षीय पदाधिकाऱ्यांच्या वतीने दुचाकी वरून रॅली काढुन मुख्य बाजारपेठेतील व्यापारी बांधवांना आपापली प्रतिष्ठान दुकाने बंद ठेवून नांदेड बंद मध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.यावेळी भाजपाचे मंडळाध्यक्ष सचिन रावका,संजय घोगरे, धीरज स्वामी, विनोंद कांचनगीरे,वैजनाथ देशमुख,डॉ. नरेश रायेवार, भी. ना. गायकवाड, विठ्ठल गायकवाड, राजु लांडगे, गौतम डुमणे, संजय इंगेवाड, सतिश बसवदे, महेंद्र तरटे, ड. प्रसेनजित वाघमारे, राजू निखाते, चंचलसिंग जट, विजया गोडघासे, मोनू जोशी, प्रमोद काळेवाड, अशोक कोंडावार, संजय बाचे, दिगंबर शिंदे, मटपती यांच्या सह अनेक कार्यकर्ते व नागरिक या बंदच्या रॅलीत सहभागी होऊन व्यापारी बांधवांना आपापली व्यापारी प्रतिष्ठाणे बंद ठेवून सहभागी होण्याचे आवाहन केले.

# साठ हजाराचा ऐवज लंपास

**तभा वृतसेवा**
**कुंडलवाडी, दि.२५ एप्रिल-**

नातेवाईकाच्या लग्नासाठी बाहेरगावी गेलेले पाहुन आज्ञाताने घराचे कुलूप तोडत साठ हजाराचा ऐवज लंपास केल्याची घटना येथे घडली. येथील रहिवासी पंढरीनाथ रामचंद्र आमेटवार हे आपल्या कुटुंबासह बाहेरगावी असलेल्या नातेवाईकाच्या लग्नास गेले असता आज्ञाताने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला व कपाट फोडून कपाटातील सोन्या चांदीचे दागिने व घरातील पितळी भांडे असा एकुण साठ हजार रुपयाचा ऐवज लंपास केला. या प्रकरणी पंढरीनाथ आमेटवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला असून सपोनी. ज्ञानेश्वर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ .शे. अ.गफुर हे पुढील तपास करीत आहेत.

# पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा मुस्लिम समाजाच्या वतीने जाहीर निषेध

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि.२५ एप्रिल-**

जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे तीन दिवसांपूर्वी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात फिरण्यासाठी गेलेल्या निष्पाप भारतीय पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला असून या हल्ल्याचा भोकर येथील मुस्लिम समाजाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला.

दि.२५ रोजी नमाज ए जुम्मा नंतर शहरातील मक्का मस्जिद समोर जमियते उलैमा ए हिंद चे नांदेड जिल्हाउपाध्यक्ष मौलाना मुबीनखॉन ईनामदार यांच्या नेतृतत्वाखाली हाताला काळया फिती बांधून पाकिस्तान मुर्दाबाद च्या घोषणा देत आतंकवाद्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानचा जाहीर निषेध करण्यात आला केंद्र शासनाने लवकरात लवकर कठोर पावले उचलून त्या आतंकवाद्यांना ठेचून काढा अशी एकमुखी मागणी करण्यात आली यावेळी .मौलाना खुर्शिद साहब,हाफेज फैजान,हाफेज सद्दाम,डॉ फेरोजखॉन ईनामदार,सय्यद जुनेद ॲड मुजाहेद खतीब,शमिमोद्दीन ईनामदार,ईब्राहिम शेख,शेख अजिज,गौस भाई, मिर्झा ताहेर बेग,अ.खालेद भाई ,अ.सत्तार भाई,मिर्झा अझहर बेग,तोहिद भाई सहित आदि शेकडो युवक उपस्तिथ होते.

# दोन ट्रकचा भीषण अपघात ; एकाचा मृत्यू तर तिघे जखमी

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि.२५ एप्रिल-**

भरधाव वेगाने धावणाऱ्या दोन ट्रकची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या भीषण अपघातात एक ट्रक पुलावरून खाली कोसळला तर दुसरा ट्रक पुलाच्या काठावर अडकला अशा या भीषण अपघातात तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत तर एकाचा मृत्यू झाला. ही घटना नांदेड किनवट राष्ट्रीय महामार्गावरील इस्लापूर हरणखरब खोलनाला पुलावर २४ एप्रिल च्या रात्री साडेनऊ ते दहाच्या दरम्यान ही घटना घडली.

या भीषण अपघातात विदर्भ यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथील गाडी मालक ईश्वर कोल्हे वय ३७ वर्ष. मंगेश पवार वय २८ वर्ष नागनाथ बुटले वय ३० वर्षे हे तिघे गंभीर जखमी झाले आहेत यांना इस्लापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात आणून प्रथम उपचार करून पुढील उपचारासाठी नांदेड येथे पाठवण्यात आले आहे तर किनवट तालुक्यातील पांगरी येथील शंकर गणेश मुतकूलवाड वय ३२ वर्ष याच्या डोक्याला जबर मार लागल्याने याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

या दोन्ही ट्रकची समोरासमोर धडक झाल्याने दोन्ही ट्रकचे समोरील केबिन चकना चुर झाले असून या केबिनमध्ये वाहन चालक अडकले होते स्थानिक नागरिकांच्या व वाहनधारकांच्या मदतीने या दोन्ही चालकांना बाहेर काढून वाचवण्यात नागरिकांना यश आले आहे. सदरील घटनेची माहिती मिळताच इस्लापूर ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश भोसले आणि रमेश चव्हाण यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन बचाव कार्य केले. एम एच २६ एडी ३१५१ या क्रमांकाचा ट्रक सोयाबीन घेऊन किनवट कडे जात होता तर एम एच १७ बी वाय ७८६८ या क्रमांकाचा ट्रक मका घेऊन नांदेड कडे जात होता या दोन्ही क्रमांकाच्या ट्रकची समोरासमोर धडक झाल्याने एमएच २६ एडी ३१५१ या क्रमांकाचा ट्रक पुलावरून २५ ते ३० फूट खोल नाल्यात कोसळला तर एम एच १७ बी वाय ७८६८ या क्रमांकाचा ट्रक पुलाच्या काठावर अडकला या दोन्ही मालवाहू ट्रकची समोरासमोर धडक झाल्याने या दोन्ही ट्रकचे मोठे नुकसान झाले आहे.

इस्लापूर ते किनवट राष्ट्रीय महामार्गावरील हरण खरब खोलनाल्यावर हा फुल असून आणि वळण रस्ता आणि चढ असल्याने समोरून येणारे वाहन दिसत नाही आणि या राष्ट्रीय महामार्गावर अपघात स्थळ असल्याचे कुठलेही नामपलक नाही तर त्याच बरोबर या पुलावर गेल्या अनेक वर्षापासून सुरक्षा कठडे बांधलेले नाही किंवा पुलाच्या कडेला लोखंडी पाईप देखील लावलेले नाही त्यामुळे या पुलावरून अनेक वाहने अपघात होऊन खोल नाल्यात कोसळल्याच्या घटना घडल्या आहेत व ताज्या घटना आहेत.

# शॉर्टसर्किटने घरातील साहित्य जळून खाक

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि.२५ एप्रिल-**

येथील अल्पभूधारक शेतकरी गोविंद महादू देवारे यांच्या माधव देवारे,नागनाथ देवारे या मुलांच्या नावे असणाऱ्या घरात महावितरण कंपनीच्या जिवंत तारेच्या शॉर्टसर्किटमुळे दि.२१ रोजी मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास आग लागली. या आगीत घरातील रोख रक्कम दाग-दागिन्यांसह संसार उपयोगी वस्तू व धान्य जळून जवळपास तब्बल दहा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

वीज गुल झाल्याने घरातील सर्वजण घराच्या छतावर झोपले असताना, मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास त्याच लोंबकाळणाऱ्या तारेचे घर्षण होऊन शॉर्टसर्किट झाल्याने घराला आग लागली. या आगीत नवदांपत्यांच्या घरातील कपाटातील अडीच तोळे सोन्याचे दागिने, एक लाख २३ हजार रोख रक्कम जळुन खाक झाले.

## संक्षिप्त वृत्त

### अखंड शिवनाम सप्ताहाची सांगता

**बिलोली-**तालुक्यातील कासराळी येथे प्रती वर्षा प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहाने सर्व धर्मिय अखंड शिवनाम सप्ताहाची सांगता दि.१९ रोजी लिंगायत समाज भूषण श्री ष.ब्र.१०८ सद्गुरु वेदांताचार्य शिवाचार्य दिगंबर महाराज वसमतकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे. सलग गेल्या चौदा वर्षा पासून राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या प्रेरणेने अशा सप्ताहाचे आयोजन केल्या जात असून यावेळी पण धार्मिक कार्यात झोकून देणारे शिवा मारोतराव पाटील यांचा महत्वाचा असा सहभाग होता.यात अभिषेक,आरती,परमरहस्य पारायण,गाथा भजन,शिवपाठ,शिवनाम जप,प्रवचन,शिव कीर्तन,आदी कार्यक्रमांची रेलचेल यावर्षी होती. हा धार्मिक उत्सव दि.१२ ते १९ एप्रिल दरम्यान पार पडला या दरम्यान शि.भ.प.श्री विश्वंभर महाराज बडुरे यांचे कीर्तन, शि.भ.प.शिवानीताई रामदास वसमते यांचे कीर्तन, शि.भ.प.श्री मोहनराव कावडे गुरुजी यांचे कीर्तन,शि.भ.प.श्री विकास महाराज धसवाडीकर यांचे कीर्तन,शि.भ.प.श्री कैलास महाराज डोंगरगावकर यांचे कीर्तन,शि.भ.प.श्री मनमत आप्पा डांगे गुरुजी उस्माननगर यांचे कीर्तन,शि.भ.प.श्री शिवशरण गुरुजी रठकलकर यांचे कीर्तन व शेवटी महाप्रसादावरील कीर्तन,शि.भ.प. श्री.वैधताचार्य महाराज वसमतकर यांच्या अमृतोपदेश ऐकण्याचे भाग्यही शिवभक्तांना लाभले.

### किसन नरवाडे यांचे निधन

**नरसी-** नायगाव तालुक्यातील खंडगाव बेंद्री येथील रहिवासी किसन धोंडीबा नरवाडे वय ५७ वर्ष यांच दि. २५ एप्रिल २०२५ रोजी शुक्रवारी सकाळी दुःखद निधन झाले आहे. किसन नरवाडे यांच्या पार्थिवावर दि. २५ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता खंडगाव बेंद्री येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी ,तिन मुली, दोन मुल,जावाई, सुना , नातू असा मोठा परिवार आहे. किसन नरवाडे हे अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे होते. ते प्रकाश नरवाडे खंडगावकर यांचे वडील होत तर ओड समाजाचे कार्यकर्ते मारोतराव नरवाडे खंडगावकर यांचे बंधू होत. अंत्यविधीस गावातील नागरिक, पाहुणे, मित्र मंडळी उपस्थित होते.



# खतगांवात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि.२५ एप्रिल-**

बिलोली तालुक्यातील ग्राम खतगांव येथे शुक्रवार दि.२५ एप्रिल रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सामुहिक मान्यवरांकडून अभिवादन करण्यात आले.

प्रथमतः बुद्ध विहारात बोधीसत्व भगवान गौतम बुद्ध यांच्या अर्धाकृती पुतळ्यास वंदन करून तद्नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य प्रतिमेस मान्यवरांकडून पुष्पहार अर्पण करण्यात आले.त्यानंतर सहशिक्षक तथा उत्कृष्ट व्हॉलीबॉलपटू व्यंकटराव पाटील खतगांवकर यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.मान्यवर स्वागत समारंभ,लहान मुलांसह कवी,गीतकार,पत्रकार जाफर आदमपूरकर व प्रतिष्ठित नागरिक विचारवंत गोविंद जाधव पाटील यांनी समयोचित मनोगत व्यक्त केले.

# आ. चिखलीकर यांचा आज भव्य नागरी सत्कार आणि २५ कोटी रुपयांच्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि.२५ एप्रिल-**

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा आज दिनांक २६ एप्रिल रोजी दुपारी एक वाजता कंधार तालुक्यातील चिखली येथे भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याच वेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पुढाकारातून मंजूर करण्यात आलेल्या २५ कोटी रुपयांच्या रस्त्याच्या विकास कामांचा शुभारंभ करण्यात येणार आहे .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समिती लोहाचे माजी सभापती बालाजी पाटील मारताळेकर उपस्थित राहणार असून यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांची विशेष उपस्थिती असणार आहे. या सोहळ्याला जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य सौ. प्रणिताताई देवरे - चिखलीकर , राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश संघटक सचिव एडवोकेट मुक्तेश्वर धोंडगे , राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष कल्याण सावकार सूर्यवंशी , माणिकराव मुकादम , सभापती संजय देशमुख , लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बाबुराव केंद्रे , भाजपा लोहा उपाध्यक्ष शंकरराव नाईक , माजी नगर अध्यक्ष जफदिन बहोद्दिन , लोहा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार , कंधारचे माजी नगर अध्यक्ष स्वप्निल लुंगारे , राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या प्रदेश सरचिटणीस श्रीमती चित्राताई लुंगारे , प्रदेश सरचिटणीस सौ. अनुसया ताई केंद्रे , माजी सभापती आनंदराव ढाकणीकर , सौ सोनालीताई ढगे, खुशालराव पाटील पांगरीकर, किशनराव डफडे , लक्ष्मणराव बोडके , मनोहर पाटील भोसीकर , राष्ट्रवादी काँग्रेसचे कंधार तालुका अध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर , राष्ट्रवादी काँग्रेसचे लोहा तालुका अध्यक्ष छत्रपती स्वामी , माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशराव साबळे , हंसराज पाटील बोरगावकर , मनोहर पाटील तेलंग , बाबुराव गिरे , छत्रपती धुतमल , माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले , माजी उपसभापती नरेंद्र गायकवाड , सुधाकर कौशल्य , नगरसेवक शेख करीम, सुभाष गायकवाड , साईनाथ कपाळे , बालाजीराव झुंबाड संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती कंधार, हनुमंत धुळगंडे सरपंच माळेगाव ,मधुकरराव डांगे कंधार दत्तात्रेय चंदनफुले , बालाजी खिल्लारे, पंचशील कांबळे , ज्ञानेश्वर चोंडे , निलेश गौर , शेख आसिफ आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. आयोजित भव्य सत्कार सोहळा आणि रस्ता विकास कामाच्या भूमिपूजन सोहळ्याला नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# भारतीय गुणवत्ता परिषदेकडून पोलिसांच्या नावीन्यपूर्ण उपक्रमाची पाहणी

## कार्यपध्दती, माहीती संकलन, सेवा वितरणचे मूल्यमापन





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ एप्रिल**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यभर राबविण्यात येत असलेल्या शंभर दिवसांच्या कृती आराखडा उपक्रमाच्या अनुषंगाने संत नामदेव सभागृहात महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत भारतीय गुणवत्ता परिषदचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या परिषदेच्या प्रतिनिधींनी कार्यालयाच्या कार्यपध्दती, माहीती संकलन तसेच सेवा वितरण पध्दतीचे मूल्यमापन करून समाधान व्यक्त केले.

या परिषदेच्या प्रतिनिधीमध्ये वरिष्ठ संचालक डॉ रामानंद शुक्ला, सहसंचालक डॉ महावीर प्रसाद तिवारी, व्यवस्थापक शुभम शर्मा यांचा समावेश होता. यावेळी प्रभारी पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, पोलिस निरीक्षक प्रेमप्रकाश माकोडे, स्थागुशाचे पोलिस निरीक्षक विकास पाटील, सायबर सेलचे पोलिस अंमलदार दत्तात्रय नागरे, लघुलेखक राजु मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शंभर दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत हिंगोली पोलिस विभागामार्फत राबविण्यात आलेल्या विविध सुधारणा, डिजिटायझेशन, तक्रार निवारण प्रणाली, ई-फाईलिंग, जनतेसाठी सुरू करण्यात आलेल्या उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

विशेष म्हणजे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेले नाविन्यपूर्ण व जनहितकारी केंद्रीय मुद्देमाल कक्ष व पोलिस अर्ज प्रणाली या उपक्रमांची माहीती भारतीय गुणवत्ता परिषदेच्या प्रतिनिधींनी जाणून घेतली. तसेच कौतुकही केले. या कक्षात पूर्ण जिल्ह्यातील मुद्देमाल एकाच कक्षामध्ये सुरक्षित ठेवण्यात आला आहे. पोनि विकास पाटील यांच्या निरीक्षणात ठेवण्यात आला आहे. त्यामुळे वेळेची, जागेची व मनुष्यबळाची बचत होऊन प्रशासकीय दृष्ट्या अधिक सोयीस्कर बनविण्यात आले आहे. भारतीय गुणवत्ता परिषदेकडून सर्व कक्षाची तसेच इतर सर्व बाबींची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी विभागीय कार्यालयाच्या कार्यपध्दती, माहीती संकलन आणि सेवा वितरण पध्दतीचे मूल्यमापन करून समाधान व्यक्त केले. यावेळी परिषदेकडून प्रशासकीय सेवा अधिक पारदर्शक, गतिमान व जनतेच्या हिताच्या दिशेने कार्यरत राहतील असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# आज भाजपची मराठवाडा विभागाची महत्वपूर्ण बैठक

## कार्यकारी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ एप्रिल**

येथील हॉटेल शांतीच्या सभागृहात भारतीय जनता पक्षाचे कार्यकारी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मराठवाडा विभागाची महत्वपूर्ण बैठक दि २६ एप्रिल रोजी दुपारी साडेतीन वाजता होणार आहे.

भारतीय जनता पक्षाची मराठवाडा विभागाची महत्वपूर्ण बैठक होणार असून या बैठकीची जय्यत तयारी करण्यात आली आहे. आ. तान्हाजीराव मुटकुळे, प्रदेश उपाध्यक्ष गजाननराव घुगे, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी आ. रामराव वडकुते, सरचिटणीस उमेश नागरे, प्रशांत सोनी, हमीद प्यारेवाले, ॲड अमोल जाधव, संतोष टेकाळे, ओम कोटकर, गणेश शिंदे, सचिन शिंदे, नारायण खेडकर, तालुकाध्यक्ष माणिक लोडे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी या बैठकीची तयारी केली असून या बैठकीसाठी लातूर ग्रामीण, लातून महानगर, नांदेड महानगर, नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, परभणी ग्रामीण, परभणी महानगर, हिंगोली या मराठवाड्यातील जिल्ह्यातील भाजपचे प्रमुख नेते, आमदार, खासदार, केंद्रीय व प्रदेश कार्यकारणी सदस्य, पदाधिकारी, जिल्हा कोअर कमीटीचे पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, सरचिटणीस, जिल्हा मोर्चा आणि प्रकोष्ठचे अध्यक्ष, संयोजक, मंडळ अध्यक्ष यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

दरम्यान, नुकत्याच हिंगोली जिल्ह्यातील भाजपच्या मंडळाच्या निवडी झाल्या असून भाजपने आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे लक्ष केंद्रीत केले आहे. कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही महत्वपूर्ण बैठक होणार असल्यामुळे या बैठकीला महत्व प्राप्त झाले आहे.

# पहलगाम आतंकवादी हल्ल्याविरोधात आज हिंगोली बंद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ एप्रिल**



जम्मू कश्मीरमधील पहलगाम येथे हिंदू पर्यटकांवर आतंकवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ सर्व हिंदू संघटना तसेच व्यापारी संघाच्यावतीने दि २६ एप्रिल शनिवारी हिंगोली बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

पहलगाम येथे २६ निष्पाह पर्यटकांनी धर्म विचारून निरपराध पर्यटकांवर अंदाधुंद गोळ्या झाडून त्यांच्या कुटुंबियांसमोर त्यांची निर्घृनपणे हत्या केली. यामध्ये २६ पर्यटकांचा मृत्यु झाला असून काही पर्यटक गंभीर जखमी झाले आहेत. या हल्ल्यामुळे संपूर्ण देशात पाकिस्तान आणि आतंकवाद्याविरोधात संतापाची लाट उसळली आहे. या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी दि २५ एप्रिल रोजी हिंगोलीतील सर्व व्यापारी संघटनांची बैठक पार पडली यावेळी दि २६ एप्रिल शनिवारी हिंगोली बंदचे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी व्यापारी संघाचे जिल्हाध्यक्ष माजी आ. गजाननराव घुगे, प्रकाशचंद सोनी, सुधीरअप्पा सराफ, पंकज अग्रवाल यांच्यासह सर्व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच सकल हिंदू संघटनांनी देखील बंदचे आवाहन पुकारले असून शहरातील महात्मा गांधी चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात येणार असून या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन सकल हिंदू संघटनेकडून करण्यात आले आहे.



**हिंगोली– भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे शहरातील अतिप्राचीन जलेश्वर तलावातील हजारो ब्रास गाळ शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर जलेश्वर तलावातून उपसला तसेच जलेश्वर तलाव सुशोभिकरण आणि संरक्षण भिंत बांधल्यामुळे यावर्षी तलावात मोठ्या प्रमाणावर पाण्याचा साठा होणार आहे. आता तलाव परिसर अतिक्रमणमुक्त झाल्याचे छायाचित्र. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### सेवा हक्क दिन साजरा करण्याचे आवाहन

हिंगोली– महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीस दि. २८ एप्रिल, २०२५ रोजी दहा वर्षे पूर्ण होत आहेत. या दशकपूर्तीचे औचित्य साधून जिल्हास्तरावर तसेच ग्राम पातळीवर ग्रामपंचायत स्तरावर विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने सर्व कार्यालय प्रमुखांनी दि. २८ एप्रिल, २०२५ रोजी जनसहभागासह विविध उपक्रम राबवून लोकसेवा हक्क दिन साजरा करावा. नागरिकामध्ये अधिनियमाची तसेच ऑनलाईन उपलब्ध सेवाबाबतची जनजागृती करावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांनी केले आहे.

### निराधार मानधनासाठी तहसीलमध्ये ठाण



हिंगोली– संजय गांधी, इंदिरा गांधी तसचे वृध्दापकाळ योजनेतील लाभार्थ्यांना मानधन मिळाले नसल्याने महिला तहसील कार्यालयाच्या चकरा मारीत आहेत. यावेळी काही महिलांनी अधिकाऱ्यांना जाब विचारीत मानधन न मिळाल्यास १ मे रोजी मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे. दि २४ एप्रिल रोजी निराधार योजनेतील महिलांनी तहसील कार्यालयात निवेदन सादर केले. या योजनांमधील लाभार्थ्यांना दिवाळीपासून मानधन मिळाले नसून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. या कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी लाभार्थ्यांची दिशाभूल करीत असून दलालांचा मोठा सुळसुळाट झाला आहे. लाभार्थ्यांनी संबंधीत विभागाला तीन ते चार वेळा कागदपत्रे देऊनही त्यांच्या खात्यावर मानधन येत नसल्याने काही वृध्द महिला तळपत्या उन्हात तहसील कार्यालयाच्या परिसरात चकरा मारतांना दिसत आहेत. परंतु तहसील कार्यालय यांचेकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे. प्रशासनाने गांभीर्याने लक्ष घालून निराधारांचा प्रश्न सोडवावा अशी मागणी वृध्द महिलांकडून होत आहे.

### हिंगोलीला तीन ते चार दिवस निर्जळी

हिंगोली– शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य पाईपलाईन गांगलवाडी परिसरातील दुघाळा रस्त्यावरील सिध्द नदीवरील पुलाचे काम करीत असतांना फुटली आहे. त्यामुळे हिंगोलीकरांना आता पाईपलाईन दुरूस्त होईपर्यंत तीन ते चार दिवस निर्जळीला सामोरे जावे लागणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने सदरील काम सुरू आहे. नगर परिषदेची सिध्देश्वर धरणातून येणारी व हिंगोली शहरास पाणीपुरवठा करणारी ४०० मिमीची मुख्य पाईपलाईन तुटली आहे. दरम्यान नगर परिषदेच्यावतीने तत्काळ युध्दपातळीवर पाईपलाईन दुरूस्तीचे काम हाती घेण्यात आले असले तरीही या कामासाठी तीन ते चार दिवस लागणार असल्याचे सांगण्यात आले. मुख्य पाईपलाईन जोडणीचे काम पूर्ण होताच शहराला सुरळीत पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचे नगर परिषदेने सांगितले आहे.

# पाकीस्तानचा ध्वज जाळत पहलगाम येथील घटनेचा विराटकडून निषेध

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ एप्रिल**



पहलगाम जम्मू काश्मीर येथे दहशतवाद्यांनी अचानकपणे देशातील विविध राज्यातून सहलीला गेलेल्या नागरिकांवर अमानुषपणे बेछूट गोळीबार करून त्यांची हत्या करण्यात आली. या घृणास्पद कृत्याचा विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिलच्या वतीने पाकिस्तानी फ्लॅग जाळून निषेध नोंदविण्यात आला. देशातील दहशतवाद संपविण्यासाठी केंद्राने कठोर पाऊल उचलावे आणि देशातून दहशवादाचा खात्मा करावा, ज्यांची अमानुषपणे हत्या करण्यात आली त्यांना शहीद म्हणून घोषित करून त्यांना तात्काळ आर्थिक मदत करावी. सर्व प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिशा च्या अध्यक्षतेत चौकशी समिती गठीत करून दोषींविरुद्ध कठोर कारवाई करावी अशी मागणी विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिलच्यावतीने करण्यात आली आहे या वेळी संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष शेख नईम शेख लाल, राष्ट्रीय संचालक शेख नौमान नवेद नईम, जिल्हाध्यक्ष शेख बासित, उपाध्यक्ष शेख अवेज, महासचिव शेख शाहनवाज, महासचिव सतीश लोणकर, प्रा.संदीप भुक्तर, पठाण साजिद खान, पठाण रउफ खान, युवक अध्यक्ष मो.आमेर बागबान, मो.परवेज, मो. तौहीद, मो. निसार, मो.अफजल, पठाण युसूफ खान गुड्डू, मो.शकील पठाण, आलम खान, आदी अनेक पदाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

# ठेकेदारांना वाटण्यात आलेल्या कामांचा चौकशी अहवाल गुलदस्त्यात ?

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ एप्रिल**

हिंगोली महावितरण कंपनीने एजी पॉलीसी अंतर्गत कृषी पंपांना वीज जोडणी देतांना चांगलीच शक्कल लढवली असून निविदांना प्रतिसाद मिळाला नसल्याचे कारण देत ठेकेदारांना १३ कोटींची कामे वाटून देण्यात आली. या कामाची वरिष्ठ पातळीवरून चौकशीही झाली मात्र अद्याप हा अहवाल गुलदस्त्यातच असल्याने उलटसुलट चर्चा होत आहे.

हिंगोली जिल्ह्यात महावितरण कंपनीला एजी पॉलिसी या योजनेमध्ये १३ कोटी रूपयांचा निधी प्राप्त झाला होता. या निधीतून शेतकऱ्यांना कृषी पंपांना तसेच विहीरीसाठी वीज जोडणी देण्याच्या सूचना होत्या. यामध्ये प्रामुख्याने चार खांब, वीज वाहीन्या व डिपी असे वीज कंपनीकडून साहीत्य उभारण्यात आले असून एका जोडणीसाठी सुमारे अडीच लाख रूपयांचा खर्च करणे अपेक्षित आहे. या कामांसाठी महावितरण कंपनीकडून निविदा काढून स्पर्धात्मक पध्दतीने कामे वाटप केल्यानंतर एका जोडणीसाठी कमीत कमी खर्च होऊन महावितरणच्या निधीमध्ये बचत झाली असती मात्र तत्कालीन अधिकाऱ्यांनी निविदांना प्रतिसाद मिळाला नसल्याचे दाखवत महावितरणच्या एका आदेशाचा आधार घेत ठेकेदारांना या कामांचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे डिसेंबर २०२२ मध्ये कामे वाटप झाल्यानंतर अवघ्या दोनच महिन्यात कामे पूर्ण करण्यात आली.

दरम्यान, इतर वेळी वीज जोडणीसाठी शेतकऱ्यांना महावितरण कार्यालयाच्या चकरा माराव्या लागतात. मात्र यावेळी अवघ्या दोन महिन्यातच सुमारे १८०० वीज जोडणी देण्याची गतिमानता वीज कंपनीने कशी दाखवली. वीज कंपनीला शेतकऱ्यांचा अचानक कसा काय पुळका आला असा सवाल उपस्थित केला जाऊ लागला आहे. या योजनेमध्ये मोठी आर्थिक उलाढाल झाल्याच्या तक्रारी वरिष्ठ पातळीवर झाल्या होत्या. त्यानंतर या प्रकरणाची चौकशीही करण्यात आली. मात्र चौकशी अहवाल अद्यापही गुलदस्त्यातच ठेवण्यात आल्याने गैरव्यवहार झाल्याची शंका उपस्थित केली जात आहे. विशेष म्हणजे वीज कंपनीलाच शॉक मीटर रिडींगचे काम करणारे ठेकेदार होऊन बसल्याचे बोलले जात असून कधीकाळी दारोदार मीटर रिडींग घेणारे आज चारचाकी गाडीत फिरत आहेत.

# भूसंपादन प्रक्रियेतील प्रलंबीत कामे तत्काळ पूर्ण करा– जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ एप्रिल**

जिल्ह्यातील विविध विकास कामांसाठी लागणाऱ्या जमिनीसाठीची भूसंपादन प्रक्रियेतील प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत संबंधित यंत्रणेला दिले.

आज येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली भूसंपादन, सार्वजनिक बांधकाम, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग वन हक्क आदी विभागाचा आढावा घेतला. यावेळी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मंजुषा मुथा, हिंगोलीचे उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, कळमनुरीच्या उपविभागीय अधिकारी प्रतीक्षा भूते, वसमतचे नायब तहसीलदार दामोदर जाधव, उप प्रादेशिक परिहवन अधिकारी राहुल गावडे, सहायक मोटार वाहन निरीक्षक अतुल बानापुरे, उप अभियंता सुदेश देशमुख आदी उपस्थित होते.

जिल्ह्यात विविध विकास प्रकल्प, त्यासाठी लागणारी जमीन, सुरु असलेले विविध कामे, मावेजाचे वाटप, भूसंपादित जमिनीची मोजणी आदी कामे तातडीने मार्गी लावावेत. नागपूर ते पत्रादेवी शक्तिपीठ महामार्ग मोजणीच्या कामासाठी शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे. त्या शेतकऱ्यांची समजूत काढून शक्तीपीठ महामार्ग मोजणी तात्काळ सुरु करावी. तसेच त्यांना मावेजा त्वरित मिळवून देण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी यावेळी दिल्या.

यावेळी जिल्ह्यातील अपघाताची संख्या कमी करण्यासंदर्भात उपाययोजना करावेत, जिल्ह्यातील बासंबा टी पॉईंट व लिंबाळा मक्ता या अपघात प्रवण क्षेत्रात पॅराबोलिक मीरर लावण्या संदर्भात सूचित केले. तसेच अवैधरित्या गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई चालू ठेवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी बैठकीत दिले. यावेळी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे यांनी अवैधरित्या गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनावर आतापर्यंत केलेली कार्यवाही, अपघात प्रवण क्षेत्र व त्याबाबत करावयाच्या उपाययोजनाची माहिती आढावा बैठकीत दिली.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी वन हक्क धारकांचे सामुहिक व वैयक्तीक वनहक्काचे जुने व नवीन नोंद झालेली दावे, वनहक्क धारकांना सातबारा वाटप, मोजणी झालेली प्रकरणे तसेच मोजणीसाठी प्रलंबित प्रकरणे, फेर चौकशीसाठी पाठविलेली प्रकरणे, अपील प्रकरणे शासन निर्णयातील तरतुदीनुसार तात्काळ निकाली काढून पात्र वनहक्क धारकांना सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी, अशी सूचना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिले. तसेच यावेळी जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचाही आढावा घेतला.

# वसमत भाजपकडून पहलगाम हल्ल्याचा निषेध



**वसमत, २५ एप्रिल**

पहलगाम येथे हिंदू पर्यटकांना त्यांचा धर्म विचारू दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून हत्या केल्या प्रकरणी निषेध करण्यात आला तसेच वसमत भाजपा पक्षातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारक या ठिकाणी मृत्यू पावलेल्या पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी शिवदास बोड्डेवार उज्वला तांबाळे, सौ.प्रीती जैस्वाल, सिताराम म्यानेवार, शिवाजी आडलिंगे, विष्णू बोचकरी, ज्ञानेश्वर मुंजाळ, शशीकुमार कुल्थे, भगवान कुदाळे, बंडु बोबडे, भगवान घाटोळ, विनायक चव्हाण, संजय कळणे, अविनाश गायकवाड, आकाश बोकन, सुधीर कुमार अलोने, बालाजी कासार,राजेश भालेराव, गोपाळ महाजन, आदित्य देशपांडे, डॉक्टर अनिल जिंतूरकर, बालाजी धोपटे, महेश भिसे, प्रवीण पोपळकर , गजानन चौडेकर,संदीप रणखांब शिवाजी गोरे, धीरज कुलथे, तुषार काटकर व भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.